आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

२१ फेब्रुवारी २०१२ | वर्ष २८ | अंक २१

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹१०

## भारतीय अर्थकारण सापशिडीचा खेळ



# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्याचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक २२ । २१ फेब्रुवारी २०१२

**मूल्य : ₹ १०**

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

मुखपृष्ठ/अंक मांडणी
**श्रीकांत झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकांसंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**
**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१, फोन : ०२४०-२३४१००४.
ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



## अंतरंग

जागरण
**कापसाची शेती सापशिडीचा खेळ**
श्रीकृष्ण उमरीकर ........ ३

आजकाल
**निवडणुकीत 'रस' असणाऱ्या मतदारांसाठी...**
ज्ञानेश्वर शेलार ........ ५

शरदऋतू
**केंद्रीय अंदाजपत्रक उद्योजक आणि शेतकऱ्यांना मोकळे करणारे हवे**
शरद जोशी ........ ७

मुद्दा
**अंधेर नगरी चौपट राजा**
गिरधर पाटील ........ १०

पत्र
**माधवराव खंडेराव मोरे, नाना तुम्हीसुद्धा...**
रवि देवांग ........ १२

कॉमन नॉन सेन्स
**न्यायाचा सर्वोच्च लय**
सुधाकर जाधव ........ १४

**शेतकरी संघटना वृत्त** ........ १६

# प्रणव मुखर्जी झोप का उडाली?

संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन तोंडावर आलेले आहे. आतापासूनच अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी 'माझी झोप उडाली आहे' अशी विधानं करायला सुरुवात केली आहे. मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. गेली ३० वर्षे स्वत: प्रणव मुखर्जी सतत सत्तेत राहिले आहेत. आजचे पंतप्रधान मनमोहन सिंग त्यांच्या खात्यातील उच्चपदस्थ अधिकारी असताना त्यांचे अर्थमंत्री म्हणून मुखर्जींनी अर्थसंकल्प सादर केला आहे. पक्षातील दोन नंबरची जागा फार काळ त्यांनी भूषविली आहे. अशी परिस्थिती असताना आणि गेल्या तीस वर्षांतील जवळपास पंचवीस वर्षे काँग्रेस किंवा काँग्रेसी नेतेच (व्ही. पी. सिंग, चंद्रशेखर, इंद्रकुमार गुजराल) देशाच्या पंतप्रधानपदी आरूढ असताना मुखर्जींची झोप आताच कशी काय उडाली? ज्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या नावाने सगळेच खडे फोडत असतात ती येऊनही दोन दशकं उलटून गेली, खरे तर जे काटकसरीचे उपाय योजायला हवे होते त्याबाबत कुठलीही कणखर भूमिका कधीही काँग्रेसप्रणित सरकारांनी घेतलेली नाही. परिणामी 'वाढता वाढता वाढे' या पद्धतीने अनुत्पादक गोष्टींवर खर्च वाढत गेला नोकरशाही बेफाम बनत गेली. या सगळ्यांचा परिणाम म्हणजे आज विकासाचा दर नुसताच स्थिरावला नसून उलट्या दिशेने जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. जागतिक पातळीवरती आर्थिक संकटं येत असताना तेथील सरकारं काटेकोरपणे उपाय योजताना दिसतात. त्याची मोठी किंमत त्यांना मोजावी लागते आणि आपले सरकार मात्र बिकट परिस्थिती असतानाही अन्नसुरक्षेच्या गोंडस नावाखाली अन्नधान्यावरील सबसिडी प्रचंड वाढविण्याच्या गोष्टी करते. प्रत्यक्षात या सबसिडीसाठी पैसा कुठून आणायचा याचे कोणाकडेही उत्तर नाही. आपले उत्पन्न कमी कमी होत चालले असून काटकसरीचे उपाय अमलात आणायला पाहिजेत, असं सांगायची हिंमत एखाद्या बापाला असून नये. आणि त्यानेच शेफारून ठेवलेली त्याची मुलेबाळे आणि बायको यांनी उधळपट्टी चालू ठेवावी मग साहजिकच अशा बापाच्या तोंडी माझी झोप उडाली अशी वाक्यं येणारच.

आजही हे शासन उत्पादक वर्गाची भलावण करताना दिसत नाहीत. भलावण तर सोडाच उत्पादकांना किमान पोषक वातावरण निर्माण व्हावे म्हणून काही केलं जात नाही. उलट त्यांच्या मार्गावर आजही शरद जोशी म्हणतात तसं 'उद्योजकतेच्या वाटे खाच, खळगे, काटेकुटे' असंच वातवरण आहे. अनुत्पादक वर्ग सोयी-सवलती लाटण्यामध्ये आजही मश्गूल आहे. गरिबांना २ रु. किलोने तांदूळ द्यायचा आणि त्या गरिबांनी तो तांदूळ ४ रु. किलोने परत बाजारात आणायचा. बिकानेर येथील दैनिक लोकमत या हिंदी वृत्तपत्राचे संपादक अशोक माथूर यांनी मोठा भन्नाट किस्सा या संदर्भात औरंगाबाद येथे जाहीर भाषणात सांगितला. बिकानेर येथील मिठाईवाल्यांचा बिकानेर भुजिया म्हणजे शेव हा पदार्थ मोठा प्रसिद्ध आहे. पूर्वीच्या काळी मटकी, मूग, उडीद यांच्या पिठापासून हा पदार्थ बनवला जायचा; पण ही कडधान्ये फार मोठ्या प्रमाणात त्या परिसरात उपलब्ध नाहीत. मग या मिठाईवाल्यांनी मोठी शक्कल लढवली. रेशनच्या दुकानातून स्वस्त मिळणारा तांदूळ, दारिद्र्य रेषेखालील लोकांकडून दुप्पट भावाने खरेदी केला, त्याचं पीठ केलं आणि त्यापासून ही बिकानेरी भुजिया बनवायला सुरुवात केली. आज सर्वत्र रेशनच्या दुकानातल्या तांदळाच्या पिठाची शेव बिकानेरी भुजिया म्हणून आपण खातो. म्हणजे बघा गरिबांसाठी किमान १ लाख कोटी रुपये खर्चून अन्नधान्य पुरविण्याची योजना राबवायची आणि हा तांदूळ परत मिठाईवाल्यांच्या रुपाने खुल्या बाजारात सामान्य ग्राहकाच्या माथी कैकपट किमतीने आणल्या जातो. इतकंच नाही, रेशनमधील गव्हाच्या पिठाचा असाच उलटा उद्योग बिस्कीट इंडस्ट्री मोठ्या प्रमाणात करते, हे एक उघड गुपित आहे. रेशनसाठीचा गहू मोठ्या प्रमाणात पडलेल्या भावाने खरेदी केल्या जातो. त्याचं पीठ बनवून ते बिस्किट उद्योगाकडे विकल्या जातं. आज जर रेशन व्यवस्थेत प्रत्यक्ष अन्नधान्य देण्याऐवजी पैसे द्यायचं ठरलं, तर मोठा हाहाकार उडेल. तो गोरगरिबांत नाही बिकानेरी मिठाईवाल्यांमध्ये आणि तत्सम बिस्किट बनविणाऱ्यांमध्ये. असा उलटा उद्योग सर्वत्र सुरू झाल्यावर आणि पाणी डोक्याच्या वरती गेल्यावर आमचे माननीय अर्थमंत्री, अघोषित उपपंतप्रधान, काँग्रेसमधील नंबर २ (खरं तर काँग्रेसमध्ये नंबर १ फक्त सोनिया गांधीच!) प्रणव मुखर्जी यांची झोप उडाली, तर त्यात नवल ते काय?



अर्थसंकल्पामध्ये प्रामुख्याने पायाभूत उद्योगांवरती भर द्यायला हवा. ही मागणी कैक वर्षांपासून सतत होते आहे; पण हे करताना आजही शासन दिसत नाही. कुठल्याही प्रकारची नवीन रोजगार निर्मिती गेल्या पंचवीस वर्षांत हे शासन करू शकलेलं नाही आणि उलट ज्या ठिकाणी प्रचंड प्रमाणात रोजगार निर्मिती होते त्या शेतीचा गळा घोटण्याचं काम मात्र मनापासून केलं जात आहे. ग्रामीण रोजगार योजना असो की अन्नसुरक्षा योजना असो, की शिक्षणाचा मूलभूत अधिकार असो या सगळ्यांत व्यर्थपणे खर्च होणाऱ्या अनुदानाला कात्री लावण्याचं धाडस प्रणव मुखर्जी दाखवणार आहेत का? सध्या कुठल्याही निवडणुका तोंडावर नाहीत. सार्वत्रिक निवडणुकांना प्रचंड अवकाश आहे. राज्याराज्यातल्या निवडणुकांबाबत तर काही बोलायलाच नको. कुठलाही निर्णय घेतला तरी त्याचा काहीच फरक राज्याराज्यांवर पडताना दिसत नाही.

विविध करांचे सुसूत्रीकरण करून कर आकारणी सोपी, सुलभ व्हावी यासाठी किमान धाडस प्रणव मुखर्जींना दाखवावे लागणार आहे. जी यंत्रणा करवसुली करते तिने काही एक प्रामाणिकपणे आणि कुशलतेने कार्यक्षमतेने काम केल्यास करांची वसुली चांगल्या पद्धतीने होऊ शकते हे वारंवार सिद्ध झाले आहे. औरंगाबाद शहरातील एक उदाहरण मोठे बोलके आहे. शहराच्या प्रमुख वस्तीतील अतिक्रमणावरती बुलडोझर फिरवण्याची हिंमत आणि कणखरपणा महापालिका आयुक्तांनी दाखविला. ते पाहून इतर भागातील अतिक्रमण केलेल्या मालमत्तांवर नुसत्या खुणा केल्या तरी तेथील सामान्य नागरिकांनी आपण होऊन आपली बांधकामं पाडून घ्यायला सुरुवात केली. प्रणव मुखर्जी तुम्ही थोडं धाडस दाखवा, कर आकारणी सोपी करा, लोकं रांगा लावून कर भरतील आणि शासनाची तिजोरी भरभरून वाहू लागेल.

# कापसाची शेती - सापशिडीचा खेळ

उन्हाळ्यात कापसाची लागवड करून, ठिबकसारखे आधुनिक तंत्रज्ञान वापरून कापसाचा उतारा वाढवता येतो. एका एकरावर २० क्विंटलपेक्षा जास्त उत्पादन घेणाऱ्या सोयगाव तालुक्यातील जरंडी येथील शेतकऱ्यांच्या कामाची माहिती आपण गेल्या साली घेतली होतीच. त्यांचे अनुकरण करण्याची वेळ आलेली आहे.
कापसाच्या निर्यातीवर असलेली बंधने, बियाण्याचे दर ठरविण्यासाठी सरकार करत असलेली ढवळाढवळ तसेच खत पुरवठ्याचा सरकारने केलेला खेळखंडोबा जेव्हा संपेल तेव्हाच कापसाचा व्यापार खऱ्या अर्थाने खुला होईल. तोवर शेतकऱ्याने खुल्या बाजारात व्यापार कसा करावा हे शिकून घेतले पाहिजे. शेवटी जो शिकेल तोच टिकेल.



**श्रीकृष्ण उमरीकर**

गेल्या साली कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी त्यांच्या मालाला अभूतपूर्व भाव मिळाल्याचा सुखद अनुभव घेतला. चालू वर्षी साधारण ४४००-४५०० वरून भाव ३६००-३७०० पर्यंत घसरले. सध्या ते रु. ४००० प्रती क्विंटलच्या आसपास आहेत. पुढे काय होईल याचा कयास बांधणे कठीण आहे; पण कापसाचा बाजार अस्थीर आहे हे मात्र नक्की. खुल्या बाजाराच्या-मुक्त अर्थव्यवस्थेच्या 'शिड्या' चढून शेतकरी आपल्या हक्काचे चार पैसे कमवू शकतो तर मध्येच सरकारी हस्तक्षेपाचे साप त्याला 'गिळून' त्याचे नुकसान करतात. असा हा सापशिडीचा खेळ आहे.

अनुभवातून माणूस शिकतो असे म्हणतात; पण गरजवंताला अक्कल नसते हेही तेवढेच खरे आहे. त्यामुळे कापसाचे भाव हंगामाच्या सुरुवातीला रु. ४५०० जरी होते तरी ते अजून वाढतील या वेड्या आशेने कित्येक शेतकऱ्यांनी आपला कापूस घरीच ठेवला. सुरुवातीला बऱ्याच जणांनी मागच्या वेचणीचा, हलका कापूस विकला. या वर्षी कापसाचा 'माईक' (मायक्रोनायर) कमी आहे. त्यामुळे सूत बनवताना यंत्रे कमी वेगाने चालवावी लागतात. म्हणून कमी माईकचा कापूस सूत कंपन्या कमी भावात विकत घेतात. त्यातच सूत कंपन्यांची आर्थक परिस्थिती तेवढी चांगली नाही. गेल्या वर्षीच्या व्यापारात त्यांनी मोठे नुकसान सोसलेले आहे. याचा परिणाम असा होतो आहे की, कापसाचा भाव अपेक्षेएवढा वाढत नाही. त्यातच गेल्या हंगामामुळे अपेक्षा वाढलेल्या!

रुईचे रोजचे भाव सकाळी ११-१२ च्या सुमारास कळतात. त्यावरून कापसाचे रोजचे भाव ठरतात. एवढेच नाही तर रुपयाची किंमत जगाचे 'लाडके चलन डॉलर'च्या तुलनेत काय अहे, आंतरराष्ट्रीय बाजारात मागणी कशी आहे, स्थानिक कारखानदारांची मागणी किती आहे आणि त्याच सोबत पुरवठा किती आहे अशा अनेक घटकांवरून भाव वर-खाली होत असतात. सामान्य शेतकयाला या सर्व घटकांची अद्ययावत माहिती नसल्यामुळे भावाची चढ-उतार त्याच्या पचनी पडत नाही.

'माझा हलका कापूस मी ४३०० च्या भावाने विकला मग चांगल्या कापसाला ३९०० चा भाव कसा? माझ्या शेजाऱ्याने त्याचा मध्यम कापूस कालच ३९०० च्या भावाने विकला मग माझ्या चांगल्या कापसाचा भाव आज ३८५० कसा? एवढेच काय सकाळी जो भाव ३८५० होता तो दुपारपर्यंत ३७७५ कसा झाला? या सारखे अनेक प्रश्न शेतकऱ्याला पडत असतात. शेतकरी या भावाच्या चढ-उतारामुळे गोंधळून गेला आहे. हे सारखे बदलणारे भाव म्हणजे काय शेअर बाजाराचे भाव आहेत काय? असा प्रश्नही त्याला पडत आहे आणि त्याचे उत्तर मात्र होकारार्थी आहे. मागणी आणि पुरवठा यांची सांगड घालत खुल्या बाजारातील वस्तुंचे भाव ठरत असतात. कापसासारख्या पिकाच्या विक्रीवरील बंधने पूर्णपणे उठली नसली तरीही ती अंशतः उठलेली आहेत आणि त्यामुळेच भावाची चढ-उतार होणारच हे आपण समजून घेतले पाहिजे.

या असल्या अस्थिर परिस्थितेचा सामना करताना शेतकऱ्याने काही गोष्टी समजून घेणे आवश्यक आहे. खुल्या बाजारात मालाच्या दर्जावरूनही मालाची किंमत ठरत असते. त्यामुळे शेतकऱ्याने आपल्या कापसाचा दर्जा उच्च राहील हे पाहिले पाहिजे. त्यासाठी ज्या वाणाच्या कापसाला आपल्या परिसरातील जिनिंगमध्ये मागणी आहे त्याचीच लागवड करावी. सोबत वेचणी करताना अत्यंत सावध राहावे. भरातला कापूस वेगळा ठेवावा. त्यात काडी-कचरा जाणार नाही याची काळजी घ्यावी. मध्यम आणि हलका कापूसही वेगवेगळा ठेवावा. कापूस विकताना चांगल्या कापसाला चांगला भाव हक्काने मागता येतो. साधारणपणे शेतकरी सगळा कापूस एकत्र करून विकायला आणतात. विकत घेताना जेव्हा कापसाचे 'ग्रेडिंग' होते तेव्हा कापसात मिसळलेला काडी-कचरा, मध्यम-हलक्या दर्जाचा कापूस यांमुळे त्याला कमी भाव मिळतो आणि यातुनच शेतकरी आणि ग्रेडर यांच्यात वाद होतो. शेतकरी आपला चांगला कापूस दाखवून भाव मागतो तर ग्रेडर त्यातला हलका कापूस दाखवत त्याचा भाव ठरवतो आणि या व्यवहारात शेतकऱ्याचा 'जय' होईल याची शक्यता कमी असते कारण त्याची गाडी रिकामी करून घेतलेली असते. त्याला आपला कापूस विकणे भाग असते. म्हणूनच जर शेतकऱ्याने आपल्या मालाची प्रतवारीप्रमाणे विभागणी केली तर जेवढा माल उच्च दर्जाचा आहे त्यास वरचा भाव मिळू शकतो. खुल्या बाजारात मालाच्या दर्जाला असलेले महत्त्व लक्षात घेतले पाहिजे आणि त्याप्रमाणे आपल्या वेचणी-साठवण करण्याच्या पद्धतीत बदल केले पाहिजेत.

कापूस विकण्याच्या आधी शेतकऱ्याने भावाची चौकशी केली पाहिजे.




जर भाव पटला तर आपण किती कापूस विकणार आहोत हे सांगून 'सौदा' पक्का केला पाहिजे. बरेचदा होते असे की चौकशी केली तेव्हा भाव जास्त असतात आण घरचा कापूस विक्रीच्या ठिकाणी पोचवेपर्यंत भाव उतरलेले असतात. हे टाळण्यासाठी सौदा करणे केव्हाही चांगले.

बरेचदा जेथे बिट होते तेथे कापसाला बरा भाव मिळतो; पण ज्याने तो विकत घेतला तो मात्र कापूस वाहनातून उतरवल्यावर त्याचा भाव कमी करतो. कापूस खरेदी करणारा व्यापाऱ्याची पत आणि विश्वासार्हता तपासूनच कापूस विक्रीचा निर्णय घ्यावा. एवढेच नाही तर इतर शेतकऱ्यांना काय अनुभव आला याचाही विचार जरूर करावा.

बरेचदा ग्रेडर-मुनीम यांनी ठरवलेला भाव जर कमी वाटला तर मालकाला जरूर भेटावे. आपण योग्य शब्दांत विनंती केली तर बरेचशे 'मालक' भाव वाढवून देतात.

बऱ्याच ठिकाणी कापूस 'अनामत' म्हणून ठेवण्याची पद्धत आहे. यामध्ये शेतकरी आपला कापूस खरेदीदाराकडे नेऊन देतो. त्याचे वजन नोंदवून पावती घेतो. पुढे ज्या दिवशी भाव योग्य वाटतील त्या दिवशी सौदा पूर्ण करतो म्हणजे कापसाचे पैसे घेतो. या पद्धतीचा मुख्य फायदा असा की शेतकऱ्याला कापूस घरात राखण्याची गरज राहत नाही. त्यामुळे संभवित नुकसान टाळता येऊ शकते. तसेच अनामत म्हणून ठेवलेल्या कापसाला 'तुट' किंवा 'कडती-कट्टी' लावली जाते. ती किती आहे याचाही विचार करावा.

बरेचदा शेतकरी आपला कापूस 'उधारीत' विकू शकतो. बरेच व्यापारी १५ दिवस किंवा ३० दिवसांनंतर पैसे घेतल्यास ५०-१०० रुपये किंवा जास्तीचा भाव वाढवून देतात. व्यवसायासाठी व्यापाऱ्याला कर्ज लागते. बँकांकडून कर्ज घेण्याचा 'सव्यापसव्यय' टाळण्यासाठी खेळत्या भांडवलासाठी लागणाऱ्या व्याजापेक्षा जास्त दरवाढ देण्यास व्यापारी सहसा तयार होतात. याचा फायदा शेतकऱ्यांनी जरूर घ्यावा. असे केल्यास व्यापाऱ्याला खेळते भांडवल कमी लागते. उधारीत घेतलेल्या कापसावर प्रक्रिया करून रुई-सरकी विकून आलेल्या पैशांतून त्याला शेतकऱ्याचे देणे द्यायचे असते. आपले देणे किती आहे याचा अंदाज घेऊनच खरेदी-विक्रीचे व्यवहार करतो आणि त्याचा फायदा सर्वांनाच होतो.

मालाच्या वजनात 'गडबड' होऊ नये म्हणून आपल्या मालाचे वजन विक्री होते त्या शिवाय जवळच्या एखाद्या वजनकाट्यावर करून घेणे योग्य ठरू शकते.

उन्हाळ्यात कापसाची लागवड करून, ठिबकसारखे आधुनिक तंत्रज्ञान वापरून कापसाचा उतारा वाढवता येतो. एका एकरावर २० क्विंटलपेक्षा जास्त उत्पादन घेणाऱ्या सोयगाव तालुक्यातील जरंडी येथील शेतकऱ्यांच्या कामाची माहिती आपण गेल्या साली घेतली होतीच. त्यांचे अनुकरण करण्याची वेळ आलेली आहे.

कापसाच्या निर्यातीवर असलेली बंधने, बियाण्याचे दर ठरविण्यासाठी सरकार करत असलेली ढवळाढवळ तसेच खत पुरवठ्याचा सरकारने केलेला खेळखंडोबा जेव्हा संपेल तेव्हाच कापसाचा व्यापार खऱ्या अर्थाने खुला होईल. तोवर शेतकऱ्याने खुल्या बाजारात व्यापार कसा करावा हे शिकून घेतले पाहिजे. शेवटी जो शिकेल तोच टिकेल.

**श्रीकृष्ण उमरीकर**
नानल पेठ, परभणी-४३१४०१
मो. ९४२२६४६२८३
umrikar@gmail.com

■■

# निवडणुकी 'रस' असणाऱ्या मतदारांसाठी...



ज्ञानेश्वर शेलार

पाकिस्तानला शिव्या देऊनसुद्धा महाराष्ट्रात सत्तेत येता येते, बॉर्डरवर लढण्याची गरज नाही, हेही नेत्यांना आता माहीत झाले आहे. तीच भाषा उत्तर भारतीयांना तिकीट देऊन जे मुंबईशी-महाराष्ट्राशी आणि मराठीशी एकरूप झालेले आहेत, ते आमचेच आहेत. अशी मखलाशी राजकारणी भाषेत करणे अत्यंत सोपे काम आहे. लोकांना अशा भाषेच्या तीस-पस्तीस वर्षांत कंटाळाही आलेला नाही. अजूनही त्यांना तो स्पष्टवक्तेपणा, बाणेदारपणा आणि डरकाळ्याच वाटतात. हे आकर्षण कमी होऊन केवळ विकासाची सौम्य सुसंस्कृत भाषा अजूनही लोकांच्या अंगवळणी पडलेली नाही. त्यांना अजूनही अशा प्रकारे उथळ, उद्धट आणि भडक राजकारणी भाषाच आवडते. अशा प्रचारात अगदी लोकशाहीला, न्यायालयाला जर आव्हान दिले गेले, तर मतदार अधिकच खुश होतात. त्यांच्या इतका बोलणारा दुसरा कुणीच नाहली. तेच फक्त ही भाषा वापरू शकतात. याचे मतदारांना अप्रूप आहे. निवडून आल्यानंतर अशी भाषा वापरणारे काय करतात हे महाराष्ट्राने अनुभवले आहे.

नुकत्याच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका संपलेल्या आहेत. त्यांचा निकाल १७ तारखेला हाती येईल. या निकालातून उमेदवारांचे आणि पक्षांचे भवितव्य काय असेल, हे ठरेल. प्रत्येक निवडणुकीत उमेदवार आणि पक्षांचे भवितव्य ठरते. काहींना पाच वर्षांसाठी उज्ज्वल भविष्यकाळ, तर काहींच्या माथी निवडणूक हरल्याचा कलंक ठरलेला असतोच. शेवटी निवडून एकच उमेदवार येणार. या सर्व गदारोळात मतदारांच्या भवितव्याचा विचार कधीच होत नाही. त्यांचे भवितव्य निवडणुकीच्या आखाड्यात प्रचाराच्या वेळी सर्वच उमेदवार आणि पक्ष हे आम्ही सत्तेत आलो तर भविष्य अत्यंत उज्ज्वल असेल. आमच्या हातात नव्या सत्ता देणार असेल तर आमच्या मागील भूतकाळाचा विचार करण्याचा प्रश्नच नाही. भविष्य उज्ज्वलच असणार. अर्थात यावेळी फक्त पक्षांचेच आणि उमेदवारांचेच भवितव्य उज्ज्वल असते. ज्यांनी मागील पाच वर्षे, दहा वर्षे, वीस वर्षे किंवा गेली पन्नास-साठ वर्षे सत्ता भोगली आहे. ज्यांच्या तिसऱ्या किंवा चौथ्या पिढीच्या हातात ही सत्तेची किल्ली मतदार पुन्हा डोळे झाकून देणार आहेत. तेही मागच्या वेळी काही करता आले नाही, आमची आपसातील भांडणे,१ राजकारण, आघाड्या, मोड-तोड, पक्षांतर, घोडेबाजार यांमुळे मतदारांकडे आम्हाला लक्ष द्यायला वेळच मिळाला नाही. आता जर सत्ता दिली, तर आम्ही फक्त तुमचे आणि तुमचेच सेवक आहोत, अशी ग्वाही दिली जाते आणि मतदारही उघड्या डोळ्याने आंधळे बनून मतदान करतात.

'कुणालाही निवडून दिले तरी, शेवटी कोण काय करणार आहे?'

'ज्यांचे खाऊन आता पोट भरले आहे त्यांना निवडून दिले तर ते निदान पुढे तरी भ्रष्टाचार करणार नाहीत.'

'आपल्या हातात काय आहे? पाच वर्षांने एकदा मतदान करावे आणि गप्प बसावे.'

'नवीन पक्षाला आणि उमेदवाराला एकदा आजमावून बघायला काय हरकत आहे.'

'या देशात आता नवीन काही घडणे नाही, उत्सवासारख्या निवडणुका येणार आणि जाणार, कोणीही आले तरी आपण आहे तिथेच राहणार!'

'एकदा मतदान करून टाकू, आपले काम संपले.'

'एकदा निवडून गेल्यानंतर त्यांचे आपण पाच वर्षे काय वाकडे करू शकतो.'

'अमूक एक उमेदवार हा फारच स्पष्टवक्ता आहे, तो कुणालाच सोडीत नाही. भल्याभल्यांना लाखोंच्या सभेत आडवा करतो.'

'पक्ष राष्ट्रीय असल्याने ग्रामपंचायतपासून तर लोकसभेपर्यंत त्यांचीच सत्ता असेल, तर निश्चितच विकासकामे होतील. कुणाचा अडसर येणार नाही.'

'आपण आपले प्रचारसभांना जाऊन किंवा पेपरमध्ये नेत्यांची भांडणे वाचून खुश व्हावे. कुणाला तरी मत देऊन मोकळे होऊ.'

अशा अनेक क्रिया-प्रतिक्रिया मतदारांच्या मनामध्ये निवडणुका जवळ आल्या, की तेव्हापासून सुरू होतात. बहुमतात असलेले सत्तेत बसतात. पुन्हा तोच रटाळ कारभार सुरू होतो. सर्वसामान्यांचे हाल काही संपत नाहीत. सत्तेत बसलेले राजे होऊन बसतात. मतदार पुन्हा हताश होऊन आपापल्या कामाला लागतात. पुन्हा पुढच्या निवडणुकीत वरीलप्रमाणे त्याच प्रतिक्रिया आणि अर्ध्या-पाऊण तासात मतदानाचे पवित्र कार्य पार पाडून सगळं विसरून जायचं ही मतदारांची स्थिती.

पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुका नुकत्याच संपल्या. त्यांच्या प्रचारात आणि महानगर पालिकांच्या चालू असलेल्या प्रचारात नेत्यांची आणि पक्षांची भांडणे. उखाळ्या पाखाळ्या काढणे, उणीदुणी काढणे, एकमेकांना शेलकी विशेषणे लावणे. एकमेकांच्या अंगावर भ्रष्टाचाराची चिखलफेक करणे, हे आता शिगेला पोहोचले आहे. सगळ्याच पक्षांचा थोडाथोडा आढावा घेतला तरी, हे स्पष्ट होईल. निवडणुकीच्या अगोदर नेहमीप्रमाणे पवार-ठाकरे भेट झाली. आमचे कौटुंबिक आणि मित्रत्वाचे संबंध आहेत आणि ते अत्यंत जुने आहेत. अगदी एकमेकांच्या मुलाबाळांचे लाड त्यांनी कसे केले त्याचेही वर्णन वर्तमानपत्रांत येऊन गेले. राजकारणात आणि निवडणुकांत आम्ही एकमेकांच्या विरोधात असलो तरी आमची कौटुंबिक मैत्री आहे आणि याची प्रचिती महाराष्ट्राने गेली ३०-३५ वर्षे घेतली आहे. हे झाल्यानंतर लगेचच पवारांनी ठाकऱ्यांनी चाळीस कोटींची मालमत्ता जमवल्याचा आरोप केला. त्यावर ठाकरेंनी मी मालमत्ता आताच अदलाबदली करायला तयार आहे, पवारांनी हे करूनच दाखवावे असे आव्हान दिले. अर्थात पवार असे करणार नाहीत. कारण त्यांना ते परवडणारे नाही. त्यांच्या गल्लीबोळातील नेत्यांसाठीच ठाकरेंनी हा आकडा खरेतर वापरायला हवा होता. अदलाबदल होणार नाही हे सगळ्यांना विदित आहे.

महाराष्ट्राने वर्षानुवर्षे बेरजेचे राजकारण अनुभवले आहे. निवडणुकीच्या

तोंडावर या बेरजेच्या गणिताला मोठे उधाण येते. मुंडेंसारख्या भाजपातील दिग्गजांच्या घरात आग लावून अजित दादांनी फार मोठे काम केले. काका-पुतण्याची लढाई निवडणुकीत मुंडेंना किती भारी पडेल, हे आता निकालानंतरच कळणार आहे. एकमेकांना संपवून टाकण्याची आणि मला संपवणारा अजून पैदा व्हायचा आहे, अशा गर्जना हजारोंच्या सभेमध्ये करणारे नेते हे निश्चितच वाघाचे काळीज घेऊन आलेले आहेत. महाराष्ट्रामध्ये सध्या वाघाचे काळीज घेऊन किंवा वाघाचे मुखवटे लावून आपल्या गाड्यांवर तशी चित्रे छापून फिरणाऱ्या नेत्यांची कमतरता नाही. वाघांची संख्या जंगलामध्ये कमी आणि शहरांमध्येच जास्त झालेली आहे. कोंबड्यांची संख्या मात्र मोठ्या प्रमाणावर घटली आहे. मतदारांचीही अवस्था कोंबडीसारखी झाली आहे. कोणत्याही गल्लीतल्या छुटपूट नेत्यालाही भेटणे किंवा त्याच्याकडून काही काम करून घेणे हे मोठे दुरापास्त झाले आहे. त्याच्याकडून विकासकामांची अपेक्षा करणे मतदारांनी केव्हाच सोडून दिले आहे. अशा नेत्यांनी लग्नमुंजीत मौतीत हजेरी लावावी. ॲक्सीडेंट झाल्यावर दवाखान्यात धाव घ्यावी. यापुरतेच ते उरले आहे. या नेत्यांची पोहोच ही अगदी राज्यपातळी किंवा दिल्लीपर्यंत असते. त्यांच्या विरोधात बोलणे किंवा त्यांनी न केलेल्या कामाबद्दल त्यांना जाब विचारणे हे कोणत्याही एकदा मताचे बटण दाबून आलेल्या मरतुकड्या मतदाराच्या आवाक्यातली गोष्ट नाही. हे नेतेही बाकी सगळ्या ठिकाणी हजर असले, त्यांच्याकडे मोठमोठ्या आलिशान गाड्या असल्या, तरी रस्ते मात्र खड्ड्यांचे, धुळीने माखलेले, त्यांच्या विभागातही शहरात चोवीस तास वीज आणि खेड्यांत १४ तास लोडशेडींग, फेब्रुवारीतच ग्रामीण भागात टँकर फिरू लागले आहेत, हे टँकरही या नेत्यांचेच, टँकर नसतील तर, वाळूचे टेंडर त्यांचेच, त्यांच्याच वाळूच्या ट्रक, सगळे नियम धाब्यावर बसवून रस्त्यांनी धावताना दिसतील किंवा शहराच्या आजूबाजूचे डोंगर पोखरण्याचे काम या नेत्यांकडेच आहे. रॉकेलची एजन्सी, रेशन दुकान इथपासूनच त्यांचे नेतृत्व सुरू होते. गरीब बिचारा मतदार अशा जिथे-तिथे भेटणाऱ्या नेत्यांना घाबरूनच असतो. त्यांचा एवढा बारदाना, ओळखी, पैसा पाहून त्याने फक्त आपल्या भागाचाही निदान सगळ्यांचा नसला तरी राजकारणात असलेल्या काहींचा तरी वैयक्तिक विकास होतो आहे ना, यावर समाधान मानावे.

माझ्या हातात सत्ता द्या, मी महानगरपालिकांचे रूप बदलून टाकीन, असे नवनिर्मित महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज ठाकरे महानगरपालिकांच्या निवडणुकीत म्हणतात. येथून मागे निदान आमच्या पक्षाला मत द्या, असे उमेदवार म्हणत असत. माझा पक्ष निवडून आला तर मी काय करीन हे सांगत असत. आता मात्र ही भाषा बदलून गेली आहे. पक्षाचीही गरज नाही. मी सत्तेत आलो तर काय करीन? अशी हुकूमशाहीची भाषा राजकारण्यांनी आणली आहे. त्यांच्या कामाची प्रचिती अजून लोकांनी प्रत्यक्षात घेतली नाही; परंतु ती निश्चितपणे शिवसेनेच्याच मार्गाची असेल यात शंका नाही. सध्या उत्तर भारतीयांविरुद्धचे बंड एवढे थंड झालेले आहे की, मुंबईत एका उत्तर भारतीय महिलेलाच तिकीट देण्यात आले आहे. अर्थात अशावेळी मुस्लिमांविरुद्ध ज्या पद्धतीने ते राष्ट्रीय मुसलमान असतील आणि या देशाच्या संस्कृतीशी एकरूप झालेले असतील तर त्यांना आमचा अजिबात विरोध नाही, असा प्रचार केला जात असे. पाकिस्तानला शिव्या देऊनसुद्धा महाराष्ट्रात सत्तेत येता येते, बॉर्डरवर लढण्याची गरज नाही, हेही नेत्यांना आता माहीत झाले आहे. तीच भाषा उत्तर भारतीयांना तिकीट देऊन जे मुंबईशी-महाराष्ट्राशी आणि मराठीशी एकरूप झालेले आहेत, ते आमचेच आहेत. अशी मखलाशी राजकारणी भाषेत करणे अत्यंत सोपे काम आहे. लोकांना अशा भाषेच्या तीस-पस्तीस वर्षांत कंटाळाही आलेला नाही. अजूनही त्यांना तो स्पष्टवक्तेपणा, बाणेदारपणा आणि डरकाळ्याच वाटतात. हे आकर्षण कमी होऊन केवळ विकासाची सौम्य सुसंस्कृत भाषा अजूनही लोकांच्या अंगवळणी पडलेली नाही. त्यांना अजूनही अशा प्रकारे उथळ, उद्धट आणि भडक राजकारणी भाषाच आवडते.

अशा प्रचारात अगदी लोकशाहीला, न्यायालयाला जर आव्हान दिले गेले, तर मतदार अधिकच खुश होतात. त्यांच्या इतका बोलणारा दुसरा कुणीच नाहली. तेच फक्त ही भाषा वापरू शकतात. याचे मतदारांना अप्रूप आहे. निवडून आल्यानंतर अशी भाषा वापरणारे काय करतात हे महाराष्ट्राने अनुभवले आहे.

२००५ साली मुंबईत अचानक झालेल्या विक्रमी पावसाने, मुंबई पाण्यात बुडाली. अतिक्रमण करून मिठी नदीचा गळा दाबल्याने पाण्याचा विसर्ग झाला नाही. संपूर्ण मुंबई तीन दिवस, कमरेइतक्या पाण्यात बुडालेली होती. मोकळी मैदाने, नद्या, सरकारी जागा या ठिकाणी अतिक्रमण करणारे कोण आहेत? आणि त्यांना पाठीशी घालणारे कोण आहेत? याची जर शहानिशा केली तर गेली २० वर्षे मुंबईत सत्ता असणाऱ्यांनी काय केले, असा प्रश्न मुंबईकरांनी निवडणुकीच्या काळात विचारायला हवा. भाषेचा, धर्माचा किंवा प्रदेशाचा, मुद्दा मुद्दाम निवडणुकीच्या काळात समोर आणायचा. आक्रमक शैलीत तो मांडायचा. नाहीच जमले तर राडा करायचा आणि एकदा बस्तान बसले की पुन्हा त्याच उत्तर भारतीयांची, बंगाल्यांची मते मिळवण्यासाठी त्यांच्यातीलच काही नेते उदयास आणायचे. ते या शहराशी, भाषेशी, संस्कृतीशी एवढे समरस झाले आहेत, की मराठी माणसालासुद्धा लाज वाटावी. म्हणून आम्ही त्यांना आमचेच समजतो असेही म्हणायचे. स्वतः बाळासाहेबांनाच मुंबईच्या रस्त्यावर तुंबलेल्या पाण्यातून होडीने मार्ग काढीत राजच्या घरी जावे लागले होते. शिवसेना भवनसुद्धा पाण्यात बुडाले होते. लोकांना अशा गोष्टी मतदानाच्या वेळी पक्षांचा आणि उमेदवारांचा इतिहास काय आहे? याची उजळणी करण्यासाठी आठवणे आवश्यक आहे. व्हॅलेंटाईन डे निवडणुकीच्या काळातच आलेला आहे. रस्त्यारस्त्यांवर व्हॅलेंटाईन डे साजरे करणाऱ्यांना फटकारणारे, दहशत निर्माण करणारे आता मात्र कोठे तोंड लपवून बसले, त्यांची तोंडेही दिसायला महाग झाले आहे. हा विषयच त्यांनी जणू अडगळीत टाकून दिला आहे. संस्कृतीरक्षकाची कातडी पांघरून लोकांना घाबरवून सोडण्याचे त्यांनी केलेले कृत्य आता तेच विसरून गेले आहेत.


ग्रामीण भागात नेहमी एक अनुभव सांगितला जातो- गारूडी आपला सापाचा खेळ दाखवताना त्यात सापाच्या आणि मुंगसाच्या लढाईचा क्लायमॅक्स असल्याचे मोठमोठ्याने ओरडून सांगतो. एका टोपलीत साप आणि एका टोपलीत मुंगूस झाकून ठेवतो. मोठा साप काढून लोकांना दाखवतो. लोकांना घाबरवतो. नंतर मुंगूस काढून दाखवतो आणि पैसे जमा करतो. हा सापाच्या आणि मुंगसाच्या लढाईची जाहिरात तो जवळजवळ तासभर ओरडून ओरडून, आपले डमरू वाजवून करतो. वारंवार लोकांच्या दानतीला आवाहन देतो. लोक पैसे टाकतात. चलाखीने या खेळामध्ये गारूडी सापाच्या आणि मुंगसाच्या लढाईचा क्लायमॅक्स कधीच दाखवीत नाही. राजकारणीही अशाच प्रकारे कलगीतुरा उभा करून मतदारांची मते केव्हा घेऊन जातात आणि निवडणुकीच्या काळात झालेली भांडणे, भ्रष्टाचाराचे आरोप, फोडाफोडी हे प्रत्यक्षात कधीच घडत नाही. उलट निवडून आल्यानंतर दोन कडवे विरोधक, सत्ता मिळण्याची शक्यता असेल तर एकमेकांच्या मांडीला मांडी लावून, गळ्यात गळा घालून, पाच-दहा वर्षे आरामात सत्ता उपभोगतात. थोडेही लोकांच्या त्यांचा कांगावा लक्षात येतो आहे असे वाटल्यास युतीतील आणि आघाडीतील पक्ष आणि नेतेही एकमेकांवर खोटे-खोटेच गुरकावतात. लोक पुन्हा त्यांनाच मते देतात. सत्ता अव्याहत चालू राहते. महानगरातील वीज, पाणी, रस्ते आणि राजकीय पक्षांचीच गुंडगिरी थांबवणे हे विषय पुन्हा पाठीमागे पडतात. लोकांना गुंडगिरी, आक्रमक पक्ष आणि उमेदवारांची अधिक भुरळ पडते.

**ज्ञानेश्वर शेलार**
मो. ९२२६७९७०१८

■■

# केंद्रीय अंदाजपत्रक उद्योजक आणि शेतकऱ्यांना मोकळे करणारे हवे

*या वर्षीच्या सादर होणाऱ्या अर्थसंकल्पाच्या निमित्ताने मा. शरद जोशी यांचा ६ फेब्रुवारी २००७ रोजी प्रसिद्ध झालेला हा लेख पुनः प्रकाशित करीत आहोत.*



शरद जोशी

**देशाच्या अर्थव्यवस्थेचे आपणच चालक आहोत, ही प्रौढी आणि त्यामुळे, सर्व मोक्याच्या जागा आपल्याच आधिपत्याखाली ठेवण्याची हाव सोडून देणे आणि भारतीय उद्योजकांना त्यांच्या उपक्रमासाठी सुलभ वातावरण निर्माण करणारे व त्यांना पाठबळ देणारे ही त्यातल्या त्यात सभ्य भूमिका स्वीकारणे, हेच आता कोणत्याही सरकारच्या दृष्टीने शहाणपणाचे ठरेल. शेतीक्षेत्राच्या दृष्टीने सरकारने शेतकऱ्यांची जमीनमालकी, निविष्ठा व शेतीमाल यांच्या बाजारपेठेचे, तसेच तंत्रज्ञान स्वीकाराचे स्वातंत्र्य याबाबतीत शेतकऱ्यांना उपद्रव देणे सोडून देणे हेच सर्वांत उत्तम ठरेल.**

भारतीय अर्थव्यवस्था विकासाच्या हिंदुगतीच्या चौकटीतून बाहेर पडून, तिने जवळजवळ दोन अंकीपर्यंत मजल मारली असली, तरी त्याचे श्रेय ना राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या धोरणांना, ना संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या धोरणांना. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या आर्थिक सुधारांना भारतीय जनता पक्षाच्या हिंदुत्वाच्या विषयपत्रिकेने वेसण घातली, तर पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग आणि अर्थमंत्री पी. चिदंबरम यांच्या खुलीकरणाकडील झुकावाला संयुक्त पुरोगामी आघाडीच्या डाव्या मित्रपक्षांनी खोडा घातला.

पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखाली तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी, अत्यल्प प्रमाणात का होईना, आर्थिक सुधारांना मोकळी केलेली वाट समाजवादाच्या जमान्यात प्रस्थापित झालेल्या पांढरपेशा वर्गाच्या तोंडाला पाणी सुटण्यास आणि भारतीय उद्योजकांच्या क्षमतेला काही अंशी मोकळा श्वास घेण्यास पुरेशी होती. शेतकऱ्यांच्या उद्योजक क्षमतेला काही उत्तेजना देण्यात मात्र हा आर्थिक सुधारांचा कार्यक्रम अजूनही अपयशी ठरला आहे. भारतीय उद्योजक मात्र या आर्थिक सुधारांमुळे नेहरूप्रणीत समाजवादी दुर्दैवाच्या फेऱ्यामुळे तयार झालेल्या 'लायसेन्स्-परमिट-निर्बंध-कोटा-इन्स्पेक्टर'च्या बेड्यांतून मुक्त झाला आणि त्याने जागतिकीकरण आणि माहितीतंत्रज्ञान यांच्या आविष्कारावर आरूढ होऊन, भारताच्या विकासाची गती दोन अंकी करण्याचा जवळजवळ चमत्कारच घडवला.

देशाच्या अर्थव्यवस्थेचे आपणच चालक आहोत, ही प्रौढी आणि त्यामुळे, सर्व मोक्याच्या जागा आपल्याच आधिपत्याखाली ठेवण्याची हाव सोडून देणे आणि भारतीय उद्योजकांना त्यांच्या उपक्रमासाठी सुलभ वातावरण निर्माण करणारे व त्यांना पाठबळ देणारे ही त्यातल्या त्यात सभ्य भूमिका स्वीकारणे, हेच आता कोणत्याही सरकारच्या दृष्टीने शहाणपणाचे ठरेल.

शेतीक्षेत्राच्या दृष्टीने सरकारने शेतकऱ्यांची जमीनमालकी, निविष्ठा व शेतीमाल यांच्या बाजारपेठेचे, तसेच तंत्रज्ञान स्वीकाराचे स्वातंत्र्य याबाबतीत शेतकऱ्यांना उपद्रव देणे सोडून देणे हेच सर्वांत उत्तम ठरेल.

**१. शेतीक्षेत्र :**

आज हजारोंनी शेतकरी आत्महत्या करीत आहेत. जे तगून आहेत, त्यांतले जवळजवळ निम्मे शेतीला 'रामराम' ठोकून, शेतीतून बाहेर पडण्याचा मार्ग शोधत आहेत. केवळ त्यांच्या बापजाद्यांनी जमिनीचा एखादा तुकडा वारसा म्हणून त्यांच्यासाठी ठेवला आहे; म्हणून ते या बुडीत शेतीव्यवसायाचे ओझे वर्षानुवर्षे वाहत आहेत. जमीन खरेदी-विक्रीसंबंधी एक नवीन धोरण आणि शेतीतून बाहेर पडणे किंवा शेतीचा स्वीकार करणे यासाठीही नवीन धोरण आखणे उचित ठरेल. जमीनमालकीसंबंधी कायद्यांतील तरतुदींच्या अभेद्यतेमुळेच शेतकरी आणि शेतीक्षेत्राबाहेरीलही कोणी शेतीत गुंतवणूक करण्यास धजत नाहीत.

**२. जमीनमालकी आणि 'रामराम' धोरण**

हरितक्रांतीच्या सुरवातीला कूळकायदा, जमीनदारीविरोधी कायदे, कमाल जमीन धारणा कायदा यांसारख्या विविध कायद्यांच्या कृपेने अनेक जमीनदारांना आणि मोठ्या जमीनधारकांना शेतीतून बाहेर पडण्याची संधी मिळाली. आधुनिक तंत्रज्ञानाने सुरू होत असलेल्या शेतीतील नवीन क्रांतीच्या सुरवातीला, ज्या शेतकऱ्यांना जागतिकीकरणाने आणि नवीन तंत्रज्ञानाने उभी केलेली आव्हाने आपल्याला पेलतील की नाही, अशी शंका वाटत असेल त्यांना शेतीतून बाहेर पडणे सुलभ व सुकर झाले पाहिजे. त्याचबरोबर या नव्या क्रांतीच्या युगातील शेती करण्याची ज्यांची इच्छा आहे व ज्यांच्याजवळ त्यासाठी आवश्यक ती साधनसामग्री, व्यवस्थापकीय क्षमता, तंत्रज्ञानाविषयीचे व्यावहारिक ज्ञान आहे आणि जागतिकीकरणाच्या आव्हानांचा सामना करण्याची धमक आहे, त्यांच्यासाठी, भले ते शेतकऱ्याच्या पोटी जन्माला आले नसोत, शेतीत प्रवेश करण्यास मुक्तद्वार असले पाहिजे. शेतीक्षेत्रातील आर्थिक सुधार केवळ बाजारपेठ, कर्ज आणि तंत्रज्ञान यांच्या स्वातंत्र्याइतपत मर्यादित असून चालणार नाही; व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्यही मिळणे आवश्यक आहे.

कारखानदारी क्षेत्रातील आर्थिक सुधारांच्या दृष्टीने आता शेतजमिनीच्या मालकीच्या प्रश्नाकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. बहुतेक राज्यांनी 'आर्थिक विकास क्षेत्रां (SEZ)'च्या उभारणीला चालना दिली आहे. लायसेन्स-परमिट-कोटा राज्याला वैतागलेले कारखानदार 'आर्थिक विकास क्षेत्रा'ची वाट धरू लागले आहेत. ज्यायोगे इतरत्र नवीन व्यवसाय सुरू करता येईल, इतकी रास्त नुकसानभरपाई मिळण्याची शाश्वती दिसत नसल्यामुळे शेतकऱ्यांनी 'आर्थिक विकास क्षेत्रां'साठी आपल्या जमिनी देण्याचे नाकारून, या प्रकल्पाविरोधी आघाडी उघडल्यामुळे तो सध्या ठप्प झाला आहे.

समर्थनीय सार्वजनिक कार्यासाठी जमिनी संपादन करण्यासाठी शेतकऱ्यांचा होणारा विरोध खालील तीन तत्त्वे मान्य केली, तर सहजपणे शमण्याची शक्यता आहे.

१. संपादनासाठी जमीन निवडताना शेतजमीन सुपीक आहे का पडीक आहे, बागायती आहे का जिराईत, एकपिकी आहे का बहुपिकी ? हे महत्त्वाचे मुद्दे होऊ

शकत नाहीत. शेतकऱ्याची - जमीनमालकाची इच्छा ही निर्णायक असावी. ज्या शेतकऱ्याला आपली शेती चालू ठेवण्याची इच्छा असेल - यशाची आशा किती का कमी असो - त्याला कायद्याचा बडगा दाखवून, जमिनीपासून वंचित करता येणार नाही.

२. एखाद्या शेतकऱ्याला शेती करणे सोडून देण्याची इच्छा असेल, तर त्याला त्याच्या मनाप्रमाणे आपल्या शेतजमिनीची वासलात लावता आली पाहिजे, अगदी खुल्या बाजारातसुद्धा त्याला आपली जमीन विकता आली पाहिजे.

३. एखाद्या शेतकऱ्याला शेती करण्यात रस नसेल आणि त्याचीच जमीन काही कारणासाठी सरकारला हवी असेल, तर त्याला खुल्या बाजारात त्या जमिनीची जी जास्तीत जास्त किंमत मिळण्याची शक्यता असेल, त्याहून अधिक किंमत देऊन सरकारने ती घ्यावी.

आकर्षक नुकसानभरपाई आणि भांडवल भागापोटी जमीन देण्यास शेतकऱ्याला प्रवृत्त केले, तरी इतकी मोठी रक्कम आणि भागभांडवल हाताळण्याची सवय नसलेल्या त्या शेतकऱ्याला ती रक्कम गुंतविण्यासंबंधी आणि भांडवल भागांच्या व्यवस्थापनासंबंधी सल्ला देणारी यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे.

शेती करीत राहणाऱ्या शेतकऱ्यांना, गोदामांची व्यवस्था उभी राहिली, तर मालाच्या ज्या पावत्या मिळतील, त्या 'निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट' म्हणून वापरता आल्या पाहिजेत. शेअर बाजारातील 'डेरिव्हेटिव्ह मार्केट'च्या धर्तीवर या गोदाम-पावत्यांची (Warehousing receipts) बाजारपेठ, तसेच शेतीला 'रामराम' किंवा शेतीत प्रवेश करण्याच्या दृष्टीने जमिनीची बाजारपेठही उभारणे आवश्यक आहे. या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना आत्महत्येला पर्याय देणारी बाजारपेठयंत्रणा उभारण्यासाठी एखादे विशेष कार्यबल (Special Task Force) स्थापन करण्याचा अर्थमंत्री विचार करू शकतील.

**३. शेतीक्षेत्राला नुकसानभरपाई**

उणे सबसिडीच्या धोरणामुळे शेतीक्षेत्राचे जे नुकसान झाले आहे, त्याची भरपाई करण्याच्या दृष्टीने सरकारला काही पावले उचलावी लागतील आणि त्यासाठी सुमारे २६०,००० कोटी रुपयांच्या आसपास खर्च येईल. शेती व्यवसाय चालू ठेवण्याची इच्छा असलेले शेतकरी आणि शेतीक्षेत्रात नव्याने प्रवेश करू इच्छिणारे बिगर-शेतकरी यांच्या दृष्टीने हे आवश्यक आहे. केवळ १९८१ ते २००० या वीस वर्षांच्या काळात शेतीमालाच्या किमती पडेल ठेवण्याच्या सरकारच्या धोरणामुळे शेतीक्षेत्राचे सुमारे ३००,००० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे.

राज्यघटनेच्या नवव्या अनुसूचित १९७३ नंतर घातलेले कायदे आता न्यायालयीन छाननीच्या कक्षेत आले आहेत. १९५५ चा जीवनावश्यक वस्तू कायदा या अनुसूचित १९७६ मध्ये घातला गेला; त्यामुळे त्याची आता न्यायालयीन पडताळणी होऊ शकते. या कायद्याच्या घटनात्मकतेला न्यायालयात कोणीतरी आव्हान देईल, याची वाट पाहणे चुकीचे ठरेल. तो रद्द करण्यासाठी सरकारने पुढाकार घेणे कितीतरी अधिक चांगले ठरेल. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात तयार झालेला हा जुनापुराणा कायदा पूर्णतःच रद्द करणे आवश्यक आहे. भविष्यात गरज पडल्यास परिस्थितीनुरूप तशा प्रकारचा सयुक्तिक कायदा नव्याने करता येऊ शकेल. १९५५चा जीवनावश्यक वस्तू कायदा रद्द झाला म्हणजे शेतीमालाची साठवणूक, वाहतूक, प्रक्रिया, व्यापार आणि निर्यात, तसेच शेतीतील निविष्ठा यांवरील सर्व निर्बंध आपोआपच संपतील. महाराष्ट्र राज्य कापूस एकाधिकार खरेदी योजना आणि तंबाखू नियंत्रण ही दोनच उदाहरणे हा कायदा किती अन्याय्य आहे, हे दाखविण्यास पुरेशी आहेत.

शेतीमालाच्या निर्यातीला बंदी करणाऱ्या सर्व व्यवस्थांच्या ऐवजी टप्प्या-टप्प्यांच्या करांची प्रणाली स्थापन करण्यात यावी; कधीही निर्यात चालू किंवा बंद करण्याच्या धरसोडीच्या निर्यातधोरणामुळे भारताला अनेक निर्यात बाजारपेठा कायमच्या गमवाव्या लागल्या आहेत. अन्न-महामंडळ भ्रष्ट आणि अकार्यक्षम बनले असून, शेती आणि स्वयंपाकघर यांची सांगड घालण्यात अपयशी ठरले आहे. ते पूर्णतः बरखास्त करून त्या जागी, शेतीमाल आणून टाकल्यानंतर बाजारातील चालू किमतीच्या ७०% रकमेच्या पावत्या देणाऱ्या गोदामांचे जाळे उभारावे आणि गोदामांच्या या पावत्या 'निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट' म्हणून वापरता येतील अशी व्यवस्था करावी. रेशनिंग म्हणजे सार्वजनिक वितरण व्यवस्थासुद्धा भ्रष्टाचारग्रस्त आणि कमालीची अकार्यक्षम बनली आहे. आजकाल दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींची यादी स्थानिक राजकीय हितसंबंधांच्या प्रभावाखाली बनते. सार्वजनिक वितरण व्यवस्था सुधारण्यासाठी आता काही प्रयत्न करणे निष्फळच ठरेल. त्यामुळे या व्यवस्थेचे संपूर्ण जाळेच मोडीत काढावे आणि वेगवेगळ्या गरजू लाभार्थी समाजघटकांसाठी 'अन्नतिकिटांची (Food Stamps)' व्यवस्था तयार करता येईल.

**४. शेतीक्षेत्रातील संस्थांचे स्वरूप**

कर्तृत्ववान नेतृत्वाखाली उभारलेल्या किंवा काही प्रकारच्या एकाधिकाराचे संरक्षण लाभलेल्या व उत्पादनातील नावीन्याचे महत्त्व नसलेल्या संस्थांचा अपवाद वगळता शेतीक्षेत्रातील सर्व सहकारी संस्था अपयशी ठरल्या आहेत.

विविध न्यायालयांत जमीनमालकीविषयक अनेक खटले तुंबून पडलेले आहेत ही वर्तमानस्थिती पाहता 'करार शेती' ला फारसे चांगले भवितव्य नाही. काही वाद उत्पन्न झाल्यास त्यासंबंधी दावे त्वरेने निकालात निघणे शेतकऱ्यांना गरजेचे आहे. आजची न्याययंत्रणा तशी हमी देण्यास असमर्थ आहे. शेतकऱ्यांची शेतजमीन व श्रम यांचे भांडवलभागात (Equity) रूपांतर करून शेतकऱ्यांच्या कंपन्या स्थापन करण्याचे आजवरचे प्रयत्न, स्त्रियांच्या मालमत्तेसंबंधी प्रकरणांच्या कारणाने फारसे पुढे गेले नाहीत. शेतजमिनीचे भांडवलभागात रूपांतर करण्याची संकल्पना लोकांना सर्वसाधारणपणे रुचली नाही; कारण त्यामुळे लग्न झालेल्या मुली किंवा विधवा झालेल्या सुना यांना संपत्तीतला वाटा नाकारण्याचा पारंपरिक युक्तिवादच निकामी ठरतो. पण, आता मुलींनाही मुलांच्या बरोबरीने जन्मतःच बापाच्या मालमत्तेत वाटा देणारा कायदा झाल्यामुळे, येत्या शेतकी क्रांतीमध्ये 'इंडिया आणि कं.' काय करते आहे, याची वाट पाहत बसण्यापेक्षा, पुन्हा एकदा 'शेतकऱ्यांच्या कंपन्या' स्थापन करण्याचा प्रयत्न करून चालवणे उपयुक्त ठरू शकेल. या 'शेतकऱ्यांच्या कंपन्या' किरकोळ खरेदी-विक्री केंद्रांचे जाळे तयार करून, ते वापरण्यात 'इंडिया आणि कंपनी' ला सरस ठरतील. शेतकऱ्यांची किरकोळ खरेदीविक्री केंद्रांची जाळी तयार झाली, तर आज जो पिकवणारा व खाणारा यांतील संधानाचा अभाव दिसतो, तो भरून निघेल. तेव्हा अर्थमंत्र्यांनी अशा प्रकारचा उपक्रम सुरू करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना सबळ प्रोत्साहन द्यायला हवे. शेतजमीन व श्रम यांचे भांडवलभागात रूपांतर करून होणाऱ्या शेतकऱ्यांच्या कंपन्यांचा आराखडा तयार करण्यासाठी एखादे 'कार्यबल' स्थापन करण्याचा विचार अर्थमंत्र्यांनी करावा.

**५. शेतीक्षेत्रातील संरचना**

अन्न, माती, पाणी तसेच शेतीतील निविष्ठा यांच्या गुणवत्ता तपासण्या करणाऱ्या प्रयोगशाळांची जाळी निर्माण करण्याच्या योजनेसाठीही अर्थमंत्र्यांनी आपल्या २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात तरतूद करायला हवी. २९ डिसेंबर २००६ रोजी अर्थसंकल्पपूर्व चर्चेच्या वेळी अंदाजे ६००० कोटी रुपये खर्चाचा या संदर्भातील एक प्रस्ताव अर्थमंत्र्यांसमोर सादर करण्यात आला आहे.

किरकोळ खरेदीविक्री केंद्रांची जाळी आणि प्रयोगशाळांची जाळी यांखेरीज, प्रत्येक गावात माहितीच्या देवाण-घेवाणीचे केंद्र असणाऱ्या 'संगणक जाळ्या'च्या उभारणीने शेतकऱ्यांना मोठी मदत होऊ शकेल. शेतकऱ्यांना अशा

केंद्रातून जगभराच्या शेतीमालाच्या बाजारपेठांतील मागणी, पुरवठा, किमती यांची परिस्थिती तसेच नजीकच्या भविष्यकाळातील संबंधित विभागांतील पिकांचे अंदाज यांबद्दलची माहिती मिळू शकेल. केंद्रातील माहिती भरण्याच्या सुविधेचा उपयोग स्थानिक माहिती गोळा करण्यासाठी, तसेच इलेक्ट्रॉनिक वायदे बाजारातील व्यवहारांसाठी होऊ शकेल. या प्रकारचे जाळे उभारण्याच्या योजनेचा तपशीलवार आराखडा तयार करण्यात आला आहे. सुमारे शंभर गावांचा समावेश होऊ शकेल अशा संगणक जाळ्याचा प्राथमिक प्रकल्प उभारण्याचा प्रयत्न करता येईल; त्यासाठी एकदाच अंदाजे फक्त एक कोटी रुपयांचा खर्च होईल.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना भ्रष्ट नोकरशाहीच्या ओझ्याखाली गटांगळ्या खाऊ लागली आहे आणि तिने शेतीच्या दैनंदिन कारभाराचे नुकसान करायला सुरवात केली आहे. या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या जागी नवीन योजना आखणे गरजेचे आहे. या योजनेअंतर्गत रोजगाराच्या शोधात असलेल्या प्रत्येक कुटुंबाला दहा लाख रुपयांचे कर्ज देण्यात यावे. इतक्या भांडवलावर प्रत्येक कुटुंबाला दर साल ८०,००० रुपयांचे उत्पन्न कमावता येऊ शकेल. या कुटुंबांना हे कर्ज देताना, या भांडवलावर त्यांनी लघुउद्योग मंत्रालयाने शिफारस केलेला एखादा स्वयंरोजगार सुरू करण्याची अट घालण्यात यावी. वर्षामागून वर्षे तीच ती दगडमातीची, मेहनती कामे करण्याची मजुरी देण्याऐवजी गरिबांना स्वयंरोजगार करण्यास उद्युक्त करणे हा या योजनेचा उद्देश असेल.

**६. शेती कर्ज**

राष्ट्रीय किसान आयोगाच्या शिफारशीनुसार पीककर्जावरील व्याजाचा दर द.सा.द.शे. ४ टक्क्यांपेक्षा जास्त असू नये. सध्याचा ७% व्याजदर आणि ४% व्याजदर यांच्यातील फरकाची रक्कम एका वेगळ्या निधीत ठेवून, वेळ आल्यास या निधीचे परिसमापन (Liquidation) करण्यात यावे.

इंग्रज सरकारने व्याजखोर सावकारीपासून शेतकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी Usurious Loan Act हा कायदा केला होता. या कायद्याने शेतकऱ्यांना आकारायच्या व्याजदराला ६% ची मर्यादा घातली होती, व्याजाच्या चक्रवाढ आकारणीस बंदी घातली होती आणि कर्जाच्या दामदुपटीलाही मनाई केली होती. हा कायदा पुनरुज्जीवित करावा आणि या कायद्यावर कुरघोडी करणारा बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट रद्द करावा. 'युझुरिअस लोन ॲक्ट'च्या तरतुदींच्या अधीन राहून, खासगी सावकारीच्या व्यवस्थेस मान्यता देऊन, काटेकोर देखरेखीखाली, त्यांना त्यांचे व्यवहार करण्यास मुभा द्यावी. कायद्याने मान्यता दिलेली असो वा नसो, खासगी सावकारांचे काही स्वभावगुण असे आहेत, की जे शेतकऱ्यांना त्यांच्या निकडीच्या वेळी उपयोगी ठरतात. त्यामुळे कोणी कितीही प्रयत्न केले, तरी त्यांचे उच्चाटन करणे अशक्य आहे, तसे करूनही चालणार नाही. त्यांना शेतीकर्जाच्या अधिकृत चौकटीत समाविष्ट करून घेणेच उपयुक्त ठरेल. आजचा विशिष्ट सावकार हा गावचा 'बनिया' नाही; आज, पुन्हा एकदा जमीनमालक बनण्याची आस असलेला शेतमजूरच शेतकऱ्यांना कर्ज देतो. राष्ट्रीय किसान आयोगाने शिफारस केल्याप्रमाणे शेतकऱ्यांकडील कर्जवसुलीला स्थगिती दिली पाहिजे; किमान भारतीय शेती उणे सबसिडीच्या जाचातून सुटत नाही तोपर्यंत तरी, सक्तीच्या कर्जवसुलीला स्थगिती दिली पाहिजे.

**७. जबाबदार सरकार**

१९९१ पासून बरेचसे निर्बंध शिथिल झाले असले, तरीही सरकारचा मनोदय खरोखरीच खुलीकरणाची आणि जागतिकीकरणाची कास धरण्याचा आहे का आणि त्या दिशेने वाटचाल करण्याची त्यांची 'राजकीय इच्छाशक्ती' आहे काय, याबद्दल भारतीय उद्योजक कमालीचे साशंक आहेत. समाजवादाच्या दुर्दैवी फेऱ्यात निर्माण झालेल्या बऱ्याच संस्था अजून जशाच्या तशा आहेत. आर्थिक सुधारांना सुरवात झाली असे म्हणत असले, तरी सरकारी नोकरदारांची संख्या सतत वाढतच आहे. नोकरशाहीला खुश ठेवण्यात सरकार अधिकाधिक उत्सुक राहत आहे. जागतिक मानाने पहिले, तर आपल्याकडे सरकारी नोकरदारांना जास्त पगार मिळतो असे नाही; एखाद्या सरकारी नोकराने सार्वजनिक क्षेत्रातील नोकरी खटपटीने मिळवली, तर त्याला तो जे काम करतो त्यासाठी भरमसाट पगार दिला जातो. ज्यांना दुर्दैवाने, सरकारी नोकरीलाच धरून राहावे लागते, ते सरकारीपणाचे ओझे वाहत राहतात आणि ते जे काही कमाल काम करतात, त्यासाठी त्यामानाने त्यांना बराच कमी पगार दिला जातो. पाचव्या वेतन आयोगाने तर राज्यांच्या आर्थिक परिस्थितीचे प्रचंड प्रमाणावर नुकसान केले आहे. सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे या पाचव्या वेतन आयोजाने नोकरदारांचे कामकाज व उत्पादकता यांच्यात सुधारणा करण्यासाठी ज्या शिफारशी केल्या होत्या, त्यांना सरळसरळ वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या. आता तर त्या शिफारशींवर अंमलबजावणी करण्याचा विचारही न करता सहाव्या वेतन आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. सरकारची सवंग लोकप्रियता आणि कामगार संघटनांची ब्लॅकमेल करण्याची वृत्ती यांची ही परिणती आहे. 'आम आदमी' कल्याणकारी सरकार या संकल्पनेमुळे चलनवाढीचा दर धोक्याच्या उंचीवर पोहोचत आहे आणि करांच्या जाळ्याचाही विस्तार वाढत आहे. एकंदरीत सर्वच करप्रणाली उत्पादकांना सजा देणारी आणि ऐतखाऊंना मजा देणारी' झाली आहे.

समाजवादी युगाने नोकरशाहीच्या साम्राज्याचे अनेक स्तर निर्माण केले. राज्यघटनेच्या ढाच्यात 'नियोजन आयोगा'ला कोठेच स्थान नाही. तरीही, आर्थिक सुधारांनंतरच्या काळातही त्याला काही धक्का न लागता, तो केंद्रशासनातील नोकरशाहीचे सर्वांत मोठे साम्राज्य म्हणून अबाधित चालू आहे. प्रधानमंत्र्यांचे कार्यालय हे तसे सौम्य आणि मध्यम म्हटले जायचे; पण आजकाल त्याचे रूप इतके अवाढव्य झाले आहे, की त्यात सर्व मंत्रालयांचे काम जवळजवळ दुसऱ्यांदा केले जाते. तेच ते काम करणाऱ्या अशा आस्थापनांची काटछाट केली पाहिजे. ज्या बाबतीत वेगळी माहिती जमा करण्याची गरज असेल, त्या बाबी वगळता प्रमुख मंत्रालयांनी गोळा केलेली माहिती प्रधानमंत्री कार्यालयासारख्या आस्थापनेने वापरावी. सरकारचा प्रशासकीय खर्च अशा पातळीला जाऊन पोहोचला आहे, की सरकारी नोकरशाही ही जणू स्वतःचीची सेवा करण्यासाठी आस्तत्वात आहे. बऱ्याच बाबतीत असे जाणवते, की भारतीय उद्योजकतेला प्रशासन हाच मोठा अडसर ठरतो.

सरकारच्या प्रशासकीय खर्चात कपात करण्यासाठी खालील उपाययोजना करता येतील :

१)अनावश्यक कामे सोडून देणे व त्यासंबंधी मंत्रालये, खाती आणि संस्था बंद करणे.

२)व्यवस्था, नोकरदारांच्या सोयीसवलती आणि कार्यालयीन डामडौल यांच्यात कपात करणे.

पदांनुसार व कायमस्वरूपी नोकरीची प्रथा बंद करून, फक्त दहा वर्षांपुरती नेमणूक करण्याची पद्धती स्वीकारावी. कार्यक्षमता लक्षात घेऊन, ही नेमणूक आणखी फक्त पाच वर्षांसाठी वाढविता येईल. या पद्धतीत आजच्यापेक्षा बराच जास्त पगार द्यावा; पण निवृत्तिवेतन, आरोग्य भत्ता, भविष्य निर्वाह निधी, घरभाडे, प्रवासभत्ता इत्यादी खिरापती बंद कराव्यात.

सर्वसामान्य नियम म्हणून कायदा व सुव्यवस्था आणि संरक्षण या दोन बाबी वगळता सर्व आर्थिक व्यवहारांतून सरकारने आपले अंग काढून घ्यावे. सार्वजनिक क्षेत्रातील तोट्यातील आस्थापनांबाबतची निर्गुंतवणूक प्रक्रिया सुस्पष्ट व पारदर्शक तत्त्वांच्या पायावर सुरूच ठेवावी. खासगीकरणाच्या मार्गाने मरणोन्मुख आस्थापनांना जिवदान देण्याची पद्धत तशी अडाणीपणाची आहे. सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापना आणि सहकारी संस्था यांची क्षेत्रे खुली करून,

**पान १६ पाहा**

# अंधेर नगरी चौपट राजा

कॉंग्रेसचा एकछत्री अंमल असताना सहकाराचा उदय झाला. ग्रामीण जनतेलाही लोकशाहीला आवश्यक असणारे सामूहिकतेचे, व्यापकतेचे एक परिमाण लाभत नेतृत्वगुण असलेल्यांना राजकीय क्षेत्रातील प्रवेशाची संधी व त्यानिमित्ताने स्थानिक नेतृत्वाचा उगम या साऱ्या जमेच्या बाबी ठरत होत्या. या साऱ्या उमलत्या नेतृत्वाला जर विधायक वा मूल्याधिष्ठीत राजकारणाची जोड मिळाली असती व चुकलेल्यांना वेळीच कठोर शासन झाले असते तर हे क्षेत्र गगनाला भिडून ग्रामीण उद्धाराला कारणीभूत ठरू शकले असते. गुजराथेतील अमूल हे त्याचे मूर्तीमंत उदाहरण. महाराष्ट्रात मात्र प्रत्यक्षात तसे न होता काही थोर प्रभूतींनी आपल्या व्यक्तीगत राजकीय महत्त्वाकांक्षेपोटी हे सारे क्षेत्र वेठीस धरून हातात असलेल्या सत्तेचा गैरवापर करत अनेक गैरप्रवृत्तींना या क्षेत्रात आणून त्यांना एक भ्रामक प्रतिष्ठा प्राप्त करून देत आपल्या व्यक्तीगत राजकारणाचा एक भाग करून टाकले आहे.



गिरधर पाटील

भारतीय व्यवस्थेत ज्या काही पवित्र गायी ठाण मांडून बसल्या आहेत त्यापैकी सहकार नावाची गाय भाग्यवान समजली पाहिजे. हिच्याबद्दल जरा काही बरेवाईट बोलायला घेतले की इस्लाम खतरे में है या जिहादी नाऱ्यासारखे काही झाले तरी सहकार वाचला पाहिजे असे नारे दिले जातात. इतर क्षेत्रात सुधारणांचे वारे वाहत असले तरी सुधार तर जाऊ द्या अनेक तज्ज्ञांनी सुचवलेल्या साध्या बदलांचे अहवाल आपल्या उध्दाराची वाट बघत बासनात खितपत पडले आहेत. या गायीचे फायदे नेमके कोणाला होतात, म्हणजे हिला चारा कोणाचा व दूध कोणाला याच्या तपशीलात गेले तर साधे व्यावहारीक निकषही पार न पाडू शकणाऱ्या या क्षेत्रावर कोट्यांवधींची बेफाम उधळण अनिर्बंधपणे कशी चालू आहे याचे आश्चर्य वाटते.

आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसाला यात दखल घेण्याचे कारण एवढेच आहे की यात उधळला जाणारा पैसा हा सर्वसामान्य करदात्यांचा आहे. आणि या क्षेत्राचे समर्थन ज्या शेतकऱ्यांसाठी हे क्षेत्र असल्याचे सांगितले जाते त्याचा खरोखर काही फायदा या आत्महत्येच्या मार्गावर येऊन पोहचलेल्या शेतकऱ्याला आहे का कुणीतरी चाणाक्षपणे ही सारी यंत्रणा आपल्या राजकीय आर्थिक लाभासाठी वेठीस धरून आहे हेही या निमित्ताने पाहणे योग्य ठरेल.

कुठल्याही उत्पादक प्रक्रियेचा मूलभूत घटक असलेले भांडवल व मनुष्यबळ या घटकांच्या अभावापोटी सहकाराचा उदय झाल्याचे दिसते. एका विचाराने, एका ध्येयाने मनुष्यबळ एकत्र आले तर सरकार नामक व्यवस्थेने भांडवलाची सोय केल्यास उत्पादन वा सेवा प्रक्रिया सुरू करून आर्थिक उन्नती साधता येईल असा सरळसोपा हिशोब यात असावा. यात सामील असलेली माणसे नीतीमान, प्रामाणिक व अभ्यासू असल्याचेही अभिप्रेत असावे. (प्रत्यक्षात ते फार स्वप्निल व कठीण आहे) स्वच्छ, पारदर्शक व्यवहार व सक्षम निर्णयप्रक्रियेला आवश्यक असणारी स्वायत्तता असण्याबरोबर या मूल्यांची पायमल्ली झाल्यास या कायद्यातच कठोर शासनाची तरतूद असणे आवश्यक होते. प्रत्यक्षात या साऱ्या निकषांवर बघू जाता आजचे सहकार क्षेत्र इतके भरकटलेले दिसते की सहकार या एका चांगल्या शब्दाचा गैरवापर व संकल्पनेचा विपर्यास होत असल्याचे दिसते.

कॉंग्रेसचा एकछत्री अंमल असताना सहकाराचा उदय झाला. ग्रामीण जनतेलाही लोकशाहीला आवश्यक असणारे सामूहिकतेचे, व्यापकतेचे एक परिमाण लाभत नेतृत्वगुण असलेल्यांना राजकीय क्षेत्रातील प्रवेशाची संधी व त्यानिमित्ताने स्थानिक नेतृत्वाचा उगम या साऱ्या जमेच्या बाबी ठरत होत्या. या साऱ्या उमलत्या नेतृत्वाला जर विधायक वा मूल्याधिष्ठीत राजकारणाची जोड मिळाली असती व चुकलेल्यांना वेळीच कठोर शासन झाले असते तर हे क्षेत्र गगनाला भिडून ग्रामीण उद्धाराला कारणीभूत ठरू शकले असते. गुजराथेतील अमूल हे त्याचे मूर्तीमंत उदाहरण. महाराष्ट्रात मात्र प्रत्यक्षात तसे न होता काही थोर प्रभूतींनी आपल्या व्यक्तीगत राजकीय महत्त्वाकांक्षेपोटी हे सारे क्षेत्र वेठीस धरून हातात असलेल्या सत्तेचा गैरवापर करत अनेक गैरप्रवृत्तींना या क्षेत्रात आणून त्यांना एक भ्रामक प्रतिष्ठा प्राप्त करून देत आपल्या व्यक्तीगत राजकारणाचा एक भाग करून टाकले आहे.

या क्षेत्राला असलेले राजकीय संरक्षण, फारसा स्पष्ट व बोचक नसणारा कायदा, नवीन असल्याने पूर्वाश्रमीचे कुठलेच संदर्भ व दाखले नसल्याने आम्ही करू ती पूर्व दिशा या न्यायाने हे क्षेत्र भरकटत आज शेवटच्या आचक्या देत आहे. यात नुकसान झाले असेल तर ते साऱ्या कृषिक्षेत्राचे. यात भौतिक नुकसानीचा तर भाग आहेच परंतु मनुष्यबळ विकासातही अनेक विकृती निर्माण झाल्या आहेत. या सहकारातून ज्या प्रकारचे नेतृत्व ग्रामीण भागात फोफावत गेले व राजकारण म्हणजे हेच असा प्रवाद रूढ होत गेल्याने सकस व प्रामाणिक नेतृत्वाचा उदय होऊ शकला नाही वा होऊ दिला नाही. आता तर एका विशिष्ट ठसा असलेल्या व त्यासाठी सोप्या ठरत असलेल्या घराणेशाही प्रवृत्तींनाच राजकारणात वाव मिळण्याची शक्यता असल्याने ग्रामीण भागातून पर्यायी नेतृत्व उभे राहण्याच्या शक्यता क्षीण होत गेल्याचे दिसते आहे. एकाद्या करारात ज्या प्रमाणे शेवटी Subject to terms conditions असा बारीक अक्षरातून इशारा असतो तद्वत आमच्या राजकारणाच्या वा विकासाच्या अटी पूर्ण करीत असाल तरच सत्ता वर्तुळात प्रवेश अन्यथा नाही अशी पूर्वअट असते. त्यामुळे सर्वदूर विविध भौगोलिक प्रदेशात एकाच प्रकारच्या नेतृत्वाच्या छायांकित प्रती बघायला मिळतात. साऱ्यांची भाषा व वर्तन हे प्रसंगी पक्ष वेगळा असला तरी तेच असते व सारे त्याच प्रकारचे राजकारण करीत असतात.

भौतिक नुकसानीचा विचार करता याच सहकाराच्या माध्यमातून कृषिक्षेत्राचे शोषण करणाऱ्या शक्ती प्रबळ होत समांतर शोषण व्यवस्था म्हणून स्थिरावू शकल्या. सरकारलाही सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागावर वा विशेषतः कृषिक्षेत्रावर नियंत्रण ठेवता आले व सार्वजनिक वितरण व्यवस्थांना लागणाऱ्या स्वस्त खाद्यान्नाची सोय करू शकले. शेतमालाला रास्त भाव न मिळू शकणाऱ्या घटकांमध्ये सहकारी तत्वावर चालवल्या जाणाऱ्या कृषि उत्पन्न बाजार समित्याच कारणीभूत असल्याचे दिसते. सहकारी साखर कारखानदारीने आजवर कुठल्याही ऊस उत्पादकाला त्याच्या उसाला रास्त दर तर जाऊ द्या, त्याच्या गुंतवणुकीवर साधा लाभांशही दिलेला नाही. उलट विनापरतीच्या ठेवींच्या रूपाने

शेतकऱ्यांच्या मुद्दलातील करोडो रूपये गिळंकृत केले. शेतकऱ्यांची कुठलीही चूक व संबंध नसतांना कारखाना वा कुठलीही सहकारी संस्था अवसायानात निघाला की मोडीत निघते ते शेतकऱ्यांचे भागभांडवल. अशा अनेक रीतीने कृषिक्षेत्रातील भांडवलाचा ऱ्हास होत, सहकारी बँका असून देखील कर्जबाजारी होत, शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची पाळी आली आहे. सहकाराचा इतका उदोउदो झालाय की खाजगी गुंतवणूक व व्यावसायीक व्यवस्थापन या क्षेत्रात प्रवेश करू शकले नाही. आजही या क्षेत्रात खाजगी गुंतवणूक व व्यवस्थापन येण्यात सहकाराचा फार मोठा अडथळा आहे. शेतमाल बाजारात तर बाजार समिती कायद्यामुळे खाजगी क्षेत्रालाच बंदी आहे. प्रक्रिया क्षेत्र काहीसे खुले केल्याचे म्हटले जात असले तरी कच्च्या मालाच्या उपलब्धतेतील अनिश्चिततेमुळे, जी बंदिस्त शेतमाल बाजाराशी निगडीत आहे, अजून खाजगी क्षेत्राला फारसे आकर्षित करू शकलेले नाही. आर्थिक गलथानपणा हे वैशिष्ट्य ठरलेल्या या सहकारी वातावरणात आपला कसा निभाव लागेल या भीतीपोटीच खाजगी क्षेत्र यात येऊ बघत नाही.

महाराष्ट्रात सुमारे दोन लाख सहकारी संस्था आहेत. यात साखर कारखाने, सुतगिरण्या, जिल्हा बँका, गृहनिर्माण संस्था, बाजार समित्या, विविध कार्यकारी सोसायट्या, पतसंस्था या प्रमुख क्षेत्रांचा समावेश होतो. यात भ्रष्टाचार नसलेली संस्था सापडल्यास तिला नोबल पुरस्कार मिळावा. या साऱ्या संस्थांमध्ये सरकारची गुंतवणूक बघितली तर आजवरच्या साऱ्या घोटाळयांचे आकडे फिके पडावेत. या साऱ्या संस्थावर नियंत्रण ठेवणारे सहकार खाते आहे. खाली मुंडी आणि पाताळ धुंडी अशी या सहकार खात्याची कार्यपद्धती आहे. आपणास कल्पना करता येणार नाही एवढे गैरव्यवहारांचे आकडे व त्यांच्यावरील कारवाईही भरपूर पण शिक्षा मात्र कोणालाच नाही हे इथले मापदंड आहेत.

या सहकाराने आपली स्वतःची कार्यपद्धती विकसित केली आहे. सहकार कायदा आहे, त्यात एवढी लवचिकता आणता येते की भल्या भल्या कायदेतज्ज्ञांना प्रश्न पडावा. सर्वसामान्यांना ढळढळीत दिसत असणारा भ्रष्टाचार या खात्याला या कायद्यामुळेच दिसत नाही. मानले तर आहे नाही तर काहीच नाही असे करण्याची हातोटीही साधता आली आहे. या साऱ्या सहकारी संस्थांचे कामकाज सहकार कायद्यानुसार नियंत्रित व्हावे म्हणून अंतर्गत लेखा परीक्षण, चौकशी समित्या वा सहकारी न्यायालये, विविध पातळ्यांवरील अधिकाऱ्यांना दंडाधिकार, साऱ्यांची तजवीज आहे; परंतु सारी व्यवस्थाच अशी करण्यात आली आहे की सारी कारवाई खालपासून मंत्र्यांपर्यंत फिरत व्हावी व त्यातून निष्पन्न काहीच होऊ नये. सहकारातील एवढी गैरव्यवहाराची प्रकरणे उघडकीस येऊनही आजवर शिक्षा मात्र कोणालाच होऊ शकली नाही यातच या साऱ्या व्यवस्थेचे गमक आहे.

आपण एखाद्या गैरव्यवहाराचे उदाहरण घेऊया. तालुका पातळीवर जर तक्रार आली तर तालुका निबंधक चौकशीचे आदेश देऊ शकतात. या चौकशीचे निकाल सदर पक्षाचे राजकीय वजन व त्यापातळीवरील अर्थपूर्ण संबंधावर अवलंबून असतात. तक्रार खरी वा खोटी असण्याशी याचा फारसा संबंध नसतो. या निकालावर समाधान न झालेला पक्ष जिल्हा निबंधकांकडे अपील करतो व झालेल्या कारवाईवर स्थगिती मिळवतो. अशी ही कारवाईवर स्थगिती मिळवण्याची उतरंड तालुका निबंधक, जिल्हा निबंधक, विभागीय आयुक्त, आयुक्त व शेवटी मंत्री अशी असते. वास्तवात या साऱ्या पातळ्यांवरच्या साऱ्या अधिकाऱ्यांना आपापल्या कार्यक्षेत्रात कारवाईचे अधिकार असतात, मात्र यातला कोणीही ते न वापरता वरच्या अधिकाऱ्याला स्थगिती देण्यासाठी खुले ठेवतो. म्हणजे मंत्र्याची स्थगिती मिळेपर्यंत संस्थेच्याच पैशांवर ४-५ वर्षांचा कालापव्यय सहज करता येतो व गैरव्यवहार अजूनही सिद्ध न झाल्याने सारे दोषी कार्यकाल संपल्याने वा नव्या निवडणुका लागल्याने पायउतार होतात वा नवीन पदावर निवडून यायची तयारी करतात. कारण एव्हाना त्यांची या कार्यपद्धतीशी चांगली ओळख झालेली असते व झालेल्या चुका सुधारत अधिक कौशल्याने ते कामाला लागतात.

मंत्र्यांचा निकालही ज्यांना मान्य नसतो त्यांना न्यायालयाचे मार्ग खुले असल्याचे सांगितले जाते. उच्च न्यायालयात व सर्वोच्च न्यायालयात नुसती स्थगिती मिळवून देणारा व करोंडोंची उलाढाल असणारा उद्योग चालतो. यात पारंगत असलेले नावाजलेले वकील असतात. एकदा या न्यायालयात दावा प्रविष्ट झाला की सातआठ वर्षांचा कालापव्यय निश्चितच करता येतो. यात तक्रारदार स्वतःच्या खिशातून तोशिष सोसत असतो तर समोरचा संस्थेच्याच पैशांवर बलाढ्य मात करीत रहातो. बऱ्याचदा न्यायालयात अशा दाव्यात फारसा अर्थ नसल्याने व कालहरणाचे इप्सित साध्य झाल्याने न्यायालयेच संबंधितांना दावा काढून घ्यायला सांगतात व कायद्याच्या दृष्टीने जैसे थे ठरलेली तक्रार परत खालच्या न्यायालयात सुनावणीला येते. तोवर न्यायाधीश वा सदरच्या दाव्याचे इतर संदर्भ बदललेले असल्याने नवीन दाव्यासारखाच हा दावा सुरू करावा लागतो.

खरे म्हणजे आर्थिक गैरव्यवहाराच्या बाबतीत चौकशी अधिकाऱ्याच्या अहवालानुसार भ्रष्टाचार सिद्ध होत असेल तर सर्व पातळ्यांवरच्या अधिकाऱ्यांना विशेषतः लेखा परिक्षक वा जिल्हा निबंधकांना त्याबद्दल पोलिसांमध्ये फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे प्रावधान आहे. मात्र ही तरतूद अभावानेच वा एक राजकीय हत्यार म्हणूनच वापरली जाते. आज साऱ्या सहकारी संस्थांतील विविध टप्प्यावरच्या भ्रष्टाचाराच्या चौकशा मंत्र्यांनी स्थगित ठेवल्या असून त्यावर कुठल्याही प्रकारची कारवाई होऊ शकत नाही. भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाईस कुठलाही अडथळा नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने सांगूनही कारवाई रोखण्यात आली आहे. आजवर सहकारातील उघडकीस आलेले सारे घोटाळे हे आपापसातील राजकीय वैमनस्य वा कुरघोडी करण्याच्या प्रयत्नांतून उघडकीस आलेले आहेत. आमचे प्रकरण दाबा नाहीतर तुमचे उघडकीस आणतो असा विरोधी पक्षांचा पवित्रा असतो. सत्ताधाऱ्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना वाचवताना विरोधी पक्षांनाही आपाआपच संरक्षण मिळत जाते.

महाराष्ट्राच्या राजकारणात सहकाराचे स्वतःचे असे एक स्थान आहे आणि राष्ट्रवादी पक्षासारखे पक्ष सहकारावर अधिपत्य गाजवून आहेत. आज सहकारातील जे काही घोटाळे बाहेर येत आहेत ते केवळ राजकीय पक्षांच्या आपापसातील संदोपसुंदी व स्पर्धेमुळे. सहकार खाते आहे ते काँग्रेसकडे व आघाडी असली तरी नुकत्याच काही बदललेल्या समीकरणांमुळे या दोन्ही पक्षांनी आपल्या स्पर्धकांची मर्मस्थाने हेरून त्यावर हल्ला करण्याची रणनीती अवलंबलेली आहे. ही स्पर्धा फारशी नव्हती तेव्हा या दोन्ही घटकांनी सामोपचाराने मार्ग काढत आपापले स्वार्थ अबाधित ठेवले होते. अनेक घोटाळे रिचवून सारे उजळमाथ्याने काय केले पायजेल हे सांगत फिरत होते. त्यांच्यातीलच सुंदोपसुंदीमुळे आता या साऱ्या सुरम्य कथा बाहेर येऊ लागल्या आहेत. निदान त्यामुळे तरी या क्षेत्राचे किमान क्षालन व्हावे व न झाल्यास उच्चाटन झाले तरी ज्यासाठी हे क्षेत्र असल्याचे सांगितले जाते त्या शेतकऱ्यांचे त्यात हितच असल्याने फारशी चिंता करण्याचे कारण नाही. मात्र सहकार हा नेमका कोणाच्या फायद्याचा हे सर्वसामान्यांना समजत नाही तोवर विना सहकार नाही उद्धार म्हणणेच भाग आहे.

**डॉ. गिरधर पाटील**

http://girdhar-liberals.blogspot.com

girdhar.patil@gmail.com

■■

# माधवराव खंडेराव मोरे, नाना तुम्हीसुद्धा...

## एक अनावृत्त पत्र



रवि देवांग

माधवरावांनी संघटनेचे प्रणेते मा. शरद जोशी व शेतकरी संघटनेबद्दल केलेली विधाने वाचून माधवराव नाना तुम्हीसुद्धा... अशी अनेकांची भावना झाली. माधवराव म्हणतात, कर्ज ही शेतकऱ्यांची पहिली गरज आहे व दरवर्षी जुने कर्ज फेडून नवीन कर्ज घेणे ही आवश्यक बाब आहे. मग सद्याच्या व्यवस्थेत शेतीसाठी तुमच्या म्हणण्याप्रमाणे कर्ज ही पहिली गरज का निर्माण झाली? ज्या व्यवसायात वस्तुचा गुणाकार होतो, तो व्यवसाय तोट्यात जाऊच कसा शकतो? शेतीमधील बरकत (बचत) छिनल्यामुळेच कर्ज होते. शेतकरी संघटनेच्या मांडणीत शेतीवरील सर्व कर्जे अनैतिक आहेत हा सिद्धांत आता सर्वमान्य झाला आहेच. इतकेच नव्हे तर कॅगच्या अहवालानुसार व रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकानुसार कर्ज वसुल्या बेकायदेशीरसुद्धा आहेत.

'शेतकऱ्यांनो योग्य कारभारी निवडा' या शीर्षकाखाली ज्येष्ठ शेतकरी नेते श्री. माधवराव खंडेराव मोरे नाना यांनी केलेले ॲग्रोवनमधून जिल्हा परिषद निवडणुकांच्या पूर्वसंध्येला शेतकऱ्यांना मतदानासंबंधीचे कळकळीचे आवाहन वाचले. गेल्या वर्षी शेतकरी संघटनेने माधवरावांचा अमृतमहोत्सव साजरा केला. याही वयात नानांची शेतकरी बहुजन समाजाविषयीची तळमळ कार्यकर्त्यांना प्रेरणादायी ठरावी अशीच आहे. नानांच्या अमृतमहोत्सवातच शेतकरी संघटनेने कर्जमुक्ती आंदोलन टप्पा-३ ची घोषणा केली. हा निव्वळ योगायोग नव्हता. ती एक ठरवून केलेली योजना होती व आहे. महाराष्ट्रातील २५,००० (पंचवीस हजार) शेतकऱ्यांनी आपले कर्जमुक्ती फॉर्म भरून मा. वामनराव चटप व गुणवंत पाटील यांच्याकडे सुपूर्त केले आहेत.

या लेखात माधवरावांनी संघटनेचे प्रणेते मा. शरद जोशी व शेतकरी संघटनेबद्दल केलेली विधाने वाचून माधवराव नाना तुम्हीसुद्धा... अशी अनेकांची भावना झाली. माधवराव म्हणतात, कर्ज ही शेतकऱ्यांची पहिली गरज आहे व दरवर्षी जुने कर्ज फेडून नवीन कर्ज घेणे ही आवश्यक बाब आहे. शेतीचा शोध लागला तेव्हा आदीमानवाने एका दाण्याचे शंभर दाणे झालेले पाहून अचंबा व्यक्त केला असेलच; पण त्या आदमानवाने कोणत्याही विविध कार्यकारी सोसायटीकडून कर्ज काढले नसेल अशी माझी खात्री आहे. मग सद्याच्या व्यवस्थेत शेतीसाठी तुमच्या म्हणण्याप्रमाणे कर्ज ही पहिली गरज का निर्माण झाली? ज्या व्यवसायात वस्तुचा गुणाकार होतो, तो व्यवसाय तोट्यात जाऊच कसा शकतो? शेतीमधील बरकत (बचत) छिनल्यामुळेच कर्ज होते. शेतकरी संघटनेच्या मांडणीत शेतीवरील सर्व कर्जे अनैतिक आहेत हा सिद्धांत आता सर्वमान्य झाला आहेच. इतकेच नव्हे तर कॅगच्या अहवालानुसार व रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकानुसार कर्ज वसुल्या बेकायदेशीरसुद्धा आहेत. ही गोष्ट 'बँकेने लुटलं शेतकऱ्याला' या पुस्तिकेत प्रकाशित व सिद्ध झाली आहे. कर्ज ही 'गरज' झाली आणि नाना तुम्ही तर तिला कांद्याप्रमाणेच जीवनावश्यक (इसेन्शीअल कमोडिटी) करून टाकली. याला काय म्हणावे?

नाना, शेतकरी कर्जबाजारी होतो याला कारण मायबाप सरकार शेतीमालाचे भाव पाडतं हेच आहे. निगेटीव्ह सबसीडी किंवा तुम्ही २९-३० वर्षांपूर्वी आम्हा पोरांना उलटीपट्टी समजावून सांगत होता ती या देशाचे अर्थमंत्री प्रणवदा यांनी गॅट करार डंकेल ड्राफ्टच्या चर्चेच्या वेळीच मान्य केली आहे. तेव्हा शेती व्यवसायावरील सर्व नियंत्रणे काढून सरकारी हस्तक्षेप छाटला तर शेतकऱ्यांकडे बरकत राहील व त्याला कर्ज घेण्याची गरजच राहणार नाही. ही गोष्ट स्पष्ट आहे. निदान ती आवश्यक गरज ठरणार नाही. म्हणून जोपर्यंत निर्यातबंदी, झोनबंदी, प्रक्रिया बंदी, वाहतुकीस बंदी, साठवणूक बंदी आदी बंदी चालू राहतील तोपर्यंत कर्जमुक्तीचा लढा हा शेतकऱ्यांचा जन्मसिद्ध हक्क ठरतो. शेतकरी संघटनेची घोषणा कर कर्जा नहीं देंगे, बिजली का बिल भी नहीं देंगे ही घोषणा यातूनच आली. (मोहन गुंजाळ) 'जब तक खेतीमाल के भाव गिराने का गोरखधंदा चलता रहेगा, तबतक कर्जमुक्ती का जन्मसिद्ध हक्क माँगता रहेगा...' किसान बंदा. (कडूअप्पा पाटील). लवकरच शेतकरी संघटना एक लाख शेतकऱ्यांचे फॉर्म पुरे होताच दिल्लीला सुप्रिम कोर्टाचा व रिझर्व्ह बँकेचा दरवाजा ठोठावणार आहे. कांद्याच्या प्रश्नी वेळी तुमच्या घरी आलो होतो व घटनेतील परिशिष्ट ९ जाळल्याप्रकरणी तुम्ही मी चुकल्याचे सांगितले होते. परिशिष्ट ९ हेच शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे

मूळ कारण आहे हा शेतकरी संघटनेचा दावा आहे. कारण ते मालमत्तेच्या मूलभूत हक्कावरील गदा आहे. माझ्यावर राष्ट्रद्रोहाचा खटला दाखल झाला आहे. याचा मला अभिमान आहे. कर्ज ही शेतकऱ्यांची आवश्यक गरज नाही तर तो सरकारशाही, नोकरशाहीने त्रेसष्ट वर्षांपासून शेतकऱ्यांवर लादलेला शाप आहे.

नाना, पिंपळगावच्या ऐतिहासिक सभेत तुम्ही शरद जोशींसोबत खूप वर्षांनी एका स्टेजवर आलात. अर्जुन बोराडे, शंकर पुरकर, तुकाराम निरगुडे यांनी हायस्कूल मैदान पुन्हा एकदा भरवून दाखविले. तुम्ही आदेश दिला 'सोसायट्या जाळा'. मी न्याहाळोद ता. धुळे ला.वि.का. सोसायटीची कर्ज कागदपत्रे जाळली. तुरुंगात जाऊन बसलो. आम्ही तुमच्या आदेशानुसार महाराष्ट्रातल्या एक हजार सोसायट्या जाळल्या असत्या तर ५ एकर वरील सरसकट उभा महाराष्ट्रातील नव्हे देशातील शेतकरी कर्जमुक्त झाला असता. मग शरद जोशींना देशातील शेतकरी कर्जमुक्त झाल्याशिवाय मी डोळे मिटणार नाही, असे म्हणायचे पाळी आली नसती, पण ते व्हायचे नव्हते...

शेतकरी संघटना आजही भरकटलेली नाही. शरद जोशी संघटनेला इमोशनल ब्लॅकमेल करीत नाही. दीड वर्षांपूर्वी शेगावला आपल्या नेत्याला मानवंदना देणारा दीड लाखांचा जमाव ३ तास रेल्वेट्रॅकवर जाऊन बसला होता. राज्य सरकार अस्तित्वात नव्हतं. राज्यपालांना आंदोलकांची मनधरणी करावी लागली. कापसाची निर्यात वाढ झाली. भाव रेकॉर्डब्रेक मिळाला. ३००० कोटी रुपयांची वीजबिल व्याज दंड मुक्तीही मिळाली हा ताजा इतिहास आहे ते इमोशनच्या आधारे झालेले आंदोलन नव्हते. सध्या संघटनेची बागडोर माझ्या हातात आहे. पुण्याच्या कृषी आयुक्तालयावरचा मोर्चा व नागपूरची प्रति विधानसभा व मुख्यमंत्र्यांच्या घरावरील हल्लाबोल. हे आजही शेतकरी संघटना बाजारपेठ व तंत्रज्ञानाच्या स्वातंत्र्यासाठी कटीबद्ध आहे हेच दर्शवित आहे. हे ब्लॅकमेलिंग नाही. शेतकऱ्यांचे कर्ज ही न संपणारी गोष्ट आहे. असे तुम्हाला वाटते. हा तुमचा दोष नाही. हा या व्यवस्थेचा दोष आहे. मी पण राष्ट्रसेवादलाच्या शाखेवरील सैनिक व समाजावादाची नशा झिंग चढलेला सैनिक होतो. तथाकथीत बलाढ्य सोव्हीएत रशियाचे तीनतेरा वाजत तुकडे तुकडे झाला तेव्हा माझी समाजवादाची नशा उतरली; पण समाजवाद किंवा सरकारी नियंत्रणे ही दारू नसून ते वीष आहे ही गोष्ट मात्र तुम्ही सिद्ध केली. त्याला उतारा फक्त शेतकऱ्यांचे स्वातंत्र्य आहे. दुसरा इलाज नाही. नाना तुमचे वय झाले आहे का? तुमच्या शरीराचा एकही स्पेअरपार्ट असा नसेल की ज्याने एसआरपी किंवा पोलिसांची लाठी खाल्ली नसेल. तुम्ही आमचे आजही प्रेरणास्थान आहात. १९८२ साली धुळ्याला जुने अमळनेर स्टॅण्डवरील तुमचे भाषण आजही माझ्या कानात घुमत आहे. मी मांडी घालून कान देऊन पहिल्या रांगेत सभा ऐकत होतो. तुम्ही म्हणाला होता, अरे शेतकऱ्यांच्या पोराहो तुम्ही असे बशेल आहात ना? अशेच मरून जाशाल; पण ही सोसायटी तुमच्या बा ने फिटणार नाही. मी शिरूड ता. धुळे सोसायटीचे २१ टक्क्यांनी कर्ज फेडले. मेल्यात जमा होतो. इंजिनिअर होतो म्हणून वाचलो. तुम्ही थकला असाल; पण आमची उमेद कायम आहे. ७७ व्या वर्षीही सुदैवाने शरद जोशी शाबूत आहेत. सत्य आणि स्वातंत्र्य याचा त्यांनी दिलेला विचार आजही लखलखीतच आहे. आता तर त्याची वेबसाईटही तयार होते आहे. अर्धपन्नाशीतील तुमची पोरं मात्र शेतकऱ्यांचं स्वातंत्र्य पाहणार आहेत. इडा पिडा टळणार आहे. बळीचं राज्य येणार आहे. तुम्ही व्यवस्थेपुढे हात टेकलेले दिसतात. तुम्ही तपस्वी आहात, आम्हीही कणभर साधक आहोत. व्यवस्थेशी झुंज देत राहू. सरकारशाही आणि नोकरशाहीचा मुडदा पाडायला आम्ही सज्ज आहोत...

शरद जोशींसारख्या एकमेकाद्वितीय या अर्थतज्ज्ञालाच कळलं आहे की, कर्ज ही जीवनावश्यक गोष्ट नाही. ती संपू शकते. त्या व्यवस्थेसाठी आम्ही आजही कटीबद्ध आहोत. झेडपी निवडणुकीत शेतकरी काय दिवे लावतील ते लावो. बाकी शेतकरी संघटनेने आपले कारभारी योग्य निवडले आहेत असं मलाही थोडं थोडं वाटू लागलं आहे. श्री स्वामी समर्थ माझ्यासारख्या टुक्कार कार्यकर्त्याला तुम्ही क्षमा करावी म्हणून समर्थ आहेतच. यापूर्वी नाशिक जिल्ह्याने सर्व १६ आमदार शेतकरी संघटनेने पुरस्कृत निवडून दिले आहेत. गेल्या वर्षी कांद्याचे निर्यात शुल्क ४७५ डॉलर प्रति टन झाले होते. पिंपळगावला संघटनेने आंदोलन केले होते. रास्ता रोको झाला. ४०० जण अटकेत गेले. ते निर्यात शुल्क शुन्यावर असते तर कांद्याला १८ रु. किलो भाव मिळाला असता. शेतकऱ्यांचे कर्ज फिटले असते. पुन्हा कर्ज काढायची गरजही पडली नसती; पण त्याऐवजी भाव मिळाला अडीच रुपये किलो. तेव्हा निर्यातबंदी मुळे बाजारपेठेच्या पारतंत्र्यामुळे भाव मिळत नाही. कर्ज फिटत नाही मग ती गरज होते. तुमच्या शब्दांत कांद्याप्रमाणे इसेन्शीअल कमोडीटी होते. या विरुद्ध आजही शरद जोशी लढत आहेत. तेव्हा ते इमोशनल ब्लॅकमेलिंग करत नसून याही वयात गात्रे शिथिल झाले असताना ते सर्व पणाला लावायला तयार आहेत. ही गोष्ट मोलाची आहे.

हायवेवरून जाताना पिंपळगावला येऊन तुम्हाला चरणस्पर्श करायला येईन. मला खात्री आहे संघटनेच्या अध्यक्षाला नमस्कार करू द्यायच्या आत नेहमीप्रमाणे उचलून तुम्ही पोटाशी धराल असा विश्वास आहे.

एसेम जोशी काहींचा उल्लेख कच्चं मडकं असा करायचे. तुमची वैचारिक भट्टी तापणं आवश्यक आहे. क्षमस्व.


**रवि देवांग**
अध्यक्ष, शेतकरी संघटना
मो. ९४२२२९६३५८
ravi.metta@rediffmail.com



**मा. शरद जोशी यांना देण्यात आलेल्या 'चतुरंग' प्रतिष्ठान जीवनगौरव पुरस्कार प्रसंगी प्रकाशित करण्यात आलेली 'दैनंदिनी २०१२' यात मा. शरद जोशी यांचेवरील विविध विचारवंतांचे लेख संकलित करण्यात आले आहेत. पुस्तकाच्या निवडक प्रती संघटक कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. मूल्य १५० रु.**

# न्यायाचा सर्वोच्च लय

सर्वोच्च न्यायालया प्रमाणेच मनमोहन सरकारला सध्याचे स्पेक्ट्रम वाटपाचे धोरण चुकीचे वाटत असेल तर त्याची निर्बुद्ध अंमलबजावणी का केली गेली याचे उत्तर या सरकारने देशाला दिले पाहिजे. अटल सरकारचा निर्णय चुकीचा होता व त्या बद्दल भाजपने देशाची माफी मागावी असे या सरकारचे मत असेल तर हा निर्णय पुढे चालू ठेवण्याची घोडचूक केल्याबद्दल मनमोहन सरकारने आधी देशाची माफी मागायला हवी होती. मनमोहन सरकार राज्य करायला नालायक आहे हेच या सरकारच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावरील प्रतिक्रियेने सिद्ध झाले आहे.



सुधाकर जाधव

१२१ कंपन्याना वाटण्यात आलेले २ जी स्पेक्ट्रम रद्द करण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय वाचताना मला अर्ल स्टेनले गार्डनर या सिद्धहस्त रहस्य कथा लेखकाची आठवण झाली. स्पेक्ट्रम वाटपात निश्चितच काही रहस्य दडलेले आहे, पण न्यायालयाने आपल्या निकालात त्याचा उलगडा केला म्हणून त्या रहस्यकथा लेखकाची आठवण झाली नाही किंवा निकाल रहस्यमय आहे म्हणूनही नाही. निकालात अनपेक्षित असे काही नाही. २जी स्पेक्ट्रमचा 'घोटाळा' राजकीय पक्षात, नव्या-जुन्या माध्यमांत, न्यायालयांमध्ये आणि परिणामी सर्वसामान्य जनतेत ज्या पद्धतीने मांडल्या गेला आणि चर्चिल्या गेला त्याचे प्रतिबिंब म्हणजे हा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आहे. गाव चर्चेचे प्रतिबिंब आणि परिणाम या निकालावर स्पष्टपणे जाणवत असल्याने मला गार्डनर यांच्या रहस्यकथांची आठवण झाली. अनेकांनी गार्डनर यांची रहस्यकथांची पुस्तके वाचली नसतील याची जाणीव असूनही मला त्याचा उल्लेख करावासा वाटला त्यामागे एक कारण आहे. गार्डनर यांच्या कथांचे एक वैशिष्ट्य आहे. त्यांनी रंगविलेले आणि अजरामर केलेले मुख्य पात्र पेरी मैसन नावाचा वकील प्रत्येक रहस्य भर न्यायालयातच उलगडून दाखवितो; पण हे इथे महत्त्वाचे नाही. त्या न्यायालयात पीठासीन न्यायाधीश कामकाज स्थगित करताना त्या त्या खटल्यातील पंचाना (ज्युरी) जी ताकीद देतात ती इथे महत्त्वाची आहे. खटल्याशी संबंधित विषयाची कोणाशी चर्चा करायची नाही, वृत्तपत्रातील विषयाशी संबंधित बातम्यासुद्धा वाचायच्या नाहीत अशी ताकीद असायची. अमेरिकेतील खऱ्या खुऱ्या न्यायालयात हे घडते की नाही मला माहित नाही; पण त्या पुस्तकातील न्यायालयात याचा काटेकोर अंमल होतो. त्या मागचे कारण अगदी स्पष्ट आहे. संबंधित विषयावर तुम्ही इतरांशी चर्चा केली, त्या संबंधीच्या बातम्या वाचल्या किंवा इतरांच्या प्रतिक्रिया ऐकल्या-वाचल्या तर त्या विषयासंबंधी तुमचे मत बनते आणि अशा विषयावर निर्णय देताना न्यायालया बाहेर बनलेल्या तुमच्या मताचा निर्णयावर परिणाम होतो हे तशी ताकद देण्यामागचे कारण असायचे. एखाद्या खटल्याच्या निकालात ही बाब किती निर्णायक ठरू शकते त्याचे ताजे आणि सर्वोत्तम उदाहरण म्हणजे २ जी स्पेक्ट्रम संबंधीचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय! या निर्णयाबद्दल म्हणजे या निर्णयाचे समर्थन करण्यात संपादक आणि स्तंभलेखक यांनी आपली शक्ती आणि शाई खर्च केली आहे. निर्णयाचे परखड विश्लेषण मात्र अपवादानेच वाचायला मिळते. संपादक, स्तंभ लेखक आणि पत्रकार सोडाच पण सर्व क्षेत्रांतील सर्व पुढाऱ्यांनी या निर्णयाचे तोंड(देखले?)भरून स्वागत केले आहे. इतरांचे सोडा; पण ज्या सरकारच्याविरुद्ध हा निर्णय आहे त्या सरकारनेसुद्धा या निर्णयाचे 'स्वागत' केले आहे; पण या निकालाने निर्माण केलेल्या अनेक प्रश्नांना बगल देऊन या निर्णयाचे स्वागत झाल्याने समाजातील न्यायबुद्धीला तर घरघर लागली नाही ना अशी शंका आल्या शिवाय राहत नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर सरकार तर्फे केंद्रीय मंत्री कपील सिब्बल यांनी दिलेली प्रतिक्रिया लक्षात घेतली तर निकाल देणाऱ्या न्यायाधीशांच्या न्यायबुद्धीवर मात्र आक्षेप घेता येत नाही. कारण सरकारलाच जर आपली काही बाजू आहे आणि ती ठामपणे मांडली पाहिजे असे वाटत नसेल तर न्यायधीशच काय जगातील कोणतीही शक्ती त्या सरकारला न्याय देऊ शकणार नाही. न्यायालयात दुसरी बाजू समोर न येणे म्हणजे एकतर्फी निकालाला आमंत्रणच आहे. सर्वोच्च न्यायालयाचा असा निकाल येण्यामागे हे महत्त्वाचे कारण असले तरी या निकालावर स्पेक्ट्रम प्रकरणासंबंधी चर्चिले जात असलेले समज-गैरसमज याचाही प्रभाव आहे. या निकालाने अनेक अनिष्ट परंपरा कायम होण्याचा आणि न्यायाची अवहेलना आणि अवमूल्यन होण्याचा धोका आहे. म्हणूनच विद्वानांनी आणि ज्यांना ज्यांना न्यायाची चाड आहे त्यांनी या निर्णयाचे सांगोपांग विश्लेषण करून यातील धोके लक्षात आणून दिले पाहिजेत.

**निकालाने निर्माण केलेले प्रश्न**

२ जी स्पेक्ट्रमच्या घोटाळ्या बाबत देशात जी संभ्रमाची स्थिती आहे तोच संभ्रम या निकालातही कायम आहे. घोटाळा नेमका काय आहे आणि कंपन्यांचे लायसन्स रद्द करण्याचे नेमके कारण याचा खुलासा होत नाही. एका बाबतीत दुमत नाही की तत्कालीन दूरसंचार मंत्री राजा यांनी स्पेक्ट्रम वाटप करताना काही बाबतीत मनमानी केली आहे. ही मनमानी कोणती हेसुद्धा या निकालावरून स्पष्ट होते. ही मनमानी मुख्यत: स्पेक्ट्रम वाटपासाठी करावयाच्या अर्जाच्या अंतिम तारखेबाबत आणि ऐन वेळी हमी रकमेचा ड्राफ्ट जमा करण्याबाबत होती. अर्जाची अंतिम तारीख बदलणे आणि ती १२ महिन्यांपेक्षा अधिक काळ गुलदस्त्यात ठेवणे यात राजाचा काही अंतस्थ हेतू असू शकतो; पण तारखेच्या आत अर्ज जमा करणाऱ्या कंपनीला लाभ देण्यासाठी राजाने तारखेत बदल केल्याचा न्यायालयाचा निष्कर्ष नक्कीच तर्कसंगत नाही. न्यायालयाने 'प्रथम या प्रथम मिळवा' या धोरणाला चुकीचे ठरविले आहे; पण राजा वर सिद्ध होण्यासारखा खरा अपराध आहे तो २००३ सालापासून म्हणजे अटलबिहारी सरकारच्या काळापासून सुरू असलेले 'प्रथम या आणि प्रथम स्पेक्ट्रम मिळवा' या धोरणात अचानक बदल केला हा. ज्या दिवशी स्पेक्ट्रम वाटप करायचे होते त्याच दिवशी राजाने कामाच्या हमी संबंधी १६०० कोटींचा ड्राफ्ट हमी म्हणून मागितला. ज्या कंपन्यांना अशी हमी रक्कम देता आली नाही त्यांचा नंबर अर्थातच हुकला. आधीच्या क्रमांकावर असलेल्या कंपन्यांना बाद करून नंतरच्या क्रमांकाच्या कंपन्यांना स्पेक्ट्रम मिळावे ही राजाची चालाखी होती; पण यात ज्या कंपन्यांची राजाशी व दूरसंचार मंत्रालयातील अधिकाऱ्याशी मिलीभगत होती याचे पुरावेदेखील याच चलाखीतून पुढे आले. राजाने १६०० कोटींच्या अनामत रकमेची मागणी जेव्हा जाहीर केली त्या वेळेच्या आधीच बनवून तयार असलेले ड्राफ्ट ज्यांनी सादर केलेत त्यांची मिलीभगत त्यातून निसंदिग्धपणे सिद्ध होते. याच कंपन्याचे परवाने रद्द करून ज्यांना

एका दिवसात १६०० कोटीचा भरणा करता आला नाही म्हणून स्पेक्ट्रम मिळाले नाही त्या कंपन्यांना स्पेक्ट्रम देण्याचा आदेश सर्वार्थाने न्यायसंगत ठरला असता; पण न्यायालयाने 'प्रथम या प्रथम मिळवा' हेच धोरण चुकीचे ठरवून सरसकट सगळ्या कंपन्याचे स्पेक्ट्रम रद्द केले. धोरण चुकीचे की बरोबर हे सांगण्याचा न्यायालयाला अधिकार नाही. ते संसदेचे काम आहे. न्यायालय धोरण संवैधानिक आहे की असंवैधानिक एवढेच ठरवू शकते आणि असंवैधानिक असेल तर रद्द करू शकते. रंग लावणे असंवैधानिक असेल तर रोजच्या व्यवहारात काय गोंधळ होईल याची कल्पना कोणालाही करता येईल. इथे रंग लावण्याची चूक नाही, तर रंगेत असणाऱ्यांना लाभ मिळू नये असा बनाव केला गेला आहे; पण जर 'प्रथम या प्रथम मिळवा' हे धोरण असंवैधानिक असेल तर न्यायालयाने या धोरणानुसार २००२-२००३ मध्ये अटलजींच्या सरकारने केलेले स्पेक्ट्रम वाटपसुद्धा रद्द करायला पाहिजे होते. न्यायालयाने तसे करणे तर्काला आणि न्यायाला धरून झाले असते; पण या बाबतीत न्यायालयाने मौन पाळणे पसंत केले. भाजपच्या दावणीला जसे उपद्रवखोर स्वामी आहेत तसे काँग्रेसकडे नसावेत आणि म्हणूनही अटलजींच्या काळातील स्पेक्ट्रम वाटपाला धक्का बसला नसेल! मनमोहन सरकारने लिलाव न करता स्पेक्ट्रम वाटप केल्याने देशाला फार मोठा तोटा सहन करावा लागला हे जे गेल्या वर्षभरात सर्वत्र वातावरण तयार करण्यात आले त्याचा न्यायालायावरही प्रभाव पडला आणि म्हणून न्यायालयाने फक्त मनमोहन सरकारने केलेले स्पेक्ट्रम वाटप रद्द केले आहे. मोठ्या नुकसानीचा हा कल्पनाविलास अर्थातच कॅग प्रमुख विनोद राय यांचा आहे आणि त्या कल्पना सागरात देश अजून गटांगळ्या खातो आहे हेच या निकालावरून स्पष्ट होते.

**अबब! केवढा हा तोटा!**

आपण असे गृहीत धरू की विनोद राय हे फार प्रामाणिक गृहस्थ आहेत . देशाला झालेले नुकसान त्यांनी चोखपणे देशासमोर मांडून मोठे देश हित केले आहे आणि आपण आता त्याच्याच गणिताच्या आधारे स्पेक्ट्रम वाटपात अटलबिहारी सरकारने देशाचे केलेले नुकसान काढू या. आत्ताच्या निर्णयानुसार १२१ कंपन्याचे स्पेक्ट्रम परत घेतल्याने सरकारकडे ३५० ते ५०० मेगाहर्टझचे स्पेक्ट्रम फेरवाटपासाठी उपलब्ध होईल असे आकडे बाहेर आले आहेत. दूरसंचार नियामक आयोगाच्या म्हणण्यानुसार या स्पेक्ट्रम रद्द करण्यामुळे देशात सुरू असलेल्या सेवांपैकी ५ टक्के सेवा प्रभावित होणार आहेत. याचा अर्थ देशातील २जी स्पेक्ट्रम आधारित ९५ टक्के सेवा या अटलबिहारी वाजपेयींच्या काळातील स्पेक्ट्रमवर आधारीत आहेत. याचा दुसरा अर्थ असा होतो की मनमोहन सरकारपेक्षा १० पट अधिक स्पेक्ट्रम अटल सरकारने वाटले आहेत! म्हणजे मनमोहन सरकारने स्पेक्ट्रम वाटपात देशाच्या तिजोरीला जेवढा चुना लावला त्यापेक्षा १० पट अधिक चुना अटल सरकारने केलेल्या वाटपाने लागला आहे असे मानावे लागेल. कॅग प्रमुख विनोद राय यांनी देशापुढे जे गणित मांडले आहे त्या गणितीय सूत्राने अटलबिहारी सरकारचा स्पेक्ट्रम 'घोटाळा' १० लाख कोटींच्याही वर होतो! पण खरेच हा घोटाळा आहे का आणि देशाचे एवढे नुकसान झाले आहे का? तसे अजिबात झालेले नाही. ना ते अटल सरकारच्या निर्णयाने झाले ना मनमोहन सरकारच्या. या वाटपामध्ये अनियमितता आणि मनमानी झाल्याने भ्रष्टाचारही झाला. हा भ्रष्टाचार सरकारी यंत्रणात होणारा नेहमीचा भ्रष्टाचार आहे. स्पेक्ट्रमचा लिलाव होण्याशी त्याचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही. लिलाव केला असता तर अटलजींच्या काळात २००३ साली आणि मनमोहनांच्या काळात २००८ साली सरकारी खजिन्यात भरभक्कम रक्कम जमा झाली असती हे खरे; पण मग सर्वसामन्यांच्या हाती मोबाईल आला नसता आणि स्वातंत्र्यानंतर सुमारे ६० वर्षे संपर्क साधनांपासून वंचित असल्याच्या वेदना भोगणाऱ्या ग्रामीण भारताला संपर्क साधन हाती येण्यासाठी आणखी ४०-५० वर्षे वाट पाहावी लागली असती. म्हणूनच लिलाव न करता स्पेक्ट्रम विकल्याने देशात अभूतपूर्व संचारक्रांती झाली हेच सत्य आहे; पण अत्यंत अकार्यक्षम आणि दुबळ्या मनमोहन सरकारमुळे देशाची सर्वोत्तम उपलब्धी ही त्या सरकारसाठी आणि देशासाठीसुद्धा लाजिरवाणी घटना बनली आहे; पण सरकारतर्फे या निर्णयाला आव्हान देण्याची भाषा न करता निमूटपणे निर्णय मान्य करताना कपील सिब्बल यांनी आपल्या अकलेचे जे तारे तोडले आहेत ते पाहता या सरकारला सत्तेत राहण्याचा काडीचाही अधिकार नाही असेच म्हणावे लागेल. सर्वोच्च न्यायालयाप्रमाणेच मनमोहन सरकारला हे धोरण चुकीचे वाटत असेल तर त्याची निर्बुद्ध अंमलबजावणी का केली गेली याचे उत्तर या सरकारने देशाला दिले पाहिजे. अटल सरकारचा निर्णय चुकीचा होता व त्याबद्दल भाजपने देशाची माफी मागावी असे या सरकारचे मत असेल तर हा निर्णय पुढे चालू ठेवण्याची घोडचूक सरकारने केल्याबद्दल आधी देशाची माफी मागायला हवी होती. मनमोहन सरकार राज्य करायला नालायक आहे हेच या सरकारच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावरील प्रतिक्रियेने सिद्ध झाले आहे.

**निष्क्रीय सरकार सक्रीय न्यायालय**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात पूर्व दूरसंचार मंत्री यांनी केलेली अनियमितता,स्पेक्ट्रम वाटप रद्द कारणे, शेअर विकले म्हणून कंपन्यांना दंड करणे आणि दूरसंचार नियामक आयोगाला रद्द केलेल्या स्पेक्ट्रम बाबत निर्णय घेण्याचे आदेश देणे याचा समावेश आहे आणि या सर्व च्या सर्व बाबी कायदा आणि घटना याची पायमल्ली करणाऱ्या आहेत. पूर्व दुरसंचार मंत्री राजा यांच्या विरुद्ध ज्या तक्रारी बाबत खटला सुरु आहे त्या तक्रारीवर सर्वोच्च न्यायालय निष्कर्ष काढून मोकळे झाले आहे. खालच्या कोर्टात सुरु असलेल्या खटल्यातील बाबीवर सर्वो च्च न्यायालयाने आधीच निर्णय देवून खालच्या कोर्टातील खटला प्रभावित केला आहे. सत्र न्यायाधीश सर्वोच्च न्यायालयाचे निष्कर्ष नाकारू शकणार आहेत का? सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने पूर्व दुरसंचार मंत्र्यावरील खटल्याचा निकाल लागण्या आधीच राजाचा निकाल लावला आहे! या निकालातील दुसरा मुद्दा कंपन्यांना दंड करण्याचा. शेअर हस्तांतरणाचे व्यवहार कंपन्यांना सेबीच्या परवानगीनेच करावे लागतात. बेकायदेशीर हस्तांतरणाला सेबी परवानगी देत नाही. कंपन्यांनी शेअर विक्री करून अव्वाच्या सव्वा नफा मिळविला म्हणून दंड करणे हेच कायद्याला धरून नाही. निकालातील तिसरा मुद्दा सरकारी धोरणाचा. स्पेक्ट्रमचे वाटप कशाप्रकारे करायचे हे ठरविण्याचा सरकारला घटनात्मक अधिकार आहे. सरकारचे धोरण न्यायालय नाही तर संसदच बदलू शकते. पण न्यायालयाने या निर्णयानुसार सरकारचे धोरण बदलून घटनात्मक मर्यादाचे उल्लंघन केले आहे. त्याही पुढे जावून न्यायालयाने रद्द केलेल्या स्पेक्ट्रम बद्दल निर्णय घेण्याचा सरकारचा अधिकार दूरसंचार नियामक आयोगाला बहाल केला आहे. नियामक आयोग सरकारला सल्ला देवू शकते निर्णय नाही घेवू शकत. सरकारचे अधिकार मर्यादित करण्याचा आणि हिरावण्याचा घटनाबाह्य निर्णय लाचार मनमोहनसिंह सरकारला मान्य आहे म्हणून घटनात्मक व कायदेशीर ठरू शकत नाही. उच्च आणि उच्चतम न्यायालये सध्या आपल्या अधिकाराला सीमा नाही या कल्पनेने आपले कामकाज चालवीत असल्याचे या निकालाने दाखवून दिले आहे. त्यांच्या अधिकाराला ते घटनेची सुद्धा सीमा मानत नसल्याने स्वामी सारख्यांना खालच्या कोर्टाच्या निर्णयाला हायकोर्ट टाळून सरळ सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याची परवानगी आणि निमंत्रण देवू लागले आहेत! न्याय मिळवून देण्यासाठी सुरु झालेल्या न्यायालयीन सक्रियतेचा प्रवास मनमानी व न्याय नाकारण्याच्या दिशेने तर होत नाही ना अशी शंका निर्माण करणारा सर्वोच्च न्यायालयाचा ताजा निकाल आहे.

**सुधाकर जाधव**
पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८
ssudhakarjadhav@gmail.com
http://myblog-common-nonsense.
blogspot.com/

■■

# गणोरी सभा गोंधळ प्रकरणी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना अटक व सुटका

**फुलंब्री (प्रतिनिधी):** आम्ही आमचे फक्त गाऱ्हाणे मांडले त्याची ही शिक्षा म्हणजे सरकार शेतकऱ्यांची मुस्कटदाबी करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न करते. अगोदरच न बोलणाऱ्या शेतकऱ्यांची बोलती कायमची बंद करण्याचा हा डाव आहे. अशी प्रतिक्रिया उमटली. त्यानंतर बऱ्याच प्रयत्नांनंतर गृहमंत्र्यांपर्यंत प्रकरण गेल्यानंतर दि. ३ फेब्रुवारी २०१२ रोजी कार्यकर्त्यांची सुटका झाली. त्याप्रसंगी गणोरी परिसरातील शंभरावर कार्यकर्ते उपस्थित होते.

सुटका झालेल्या कार्यकर्त्यांचे वकील आघाडी महाराष्ट्र अध्यक्ष ॲड. प्रकाशसिंह पाटील, मराठवाडा अध्यक्ष कैलास तवार, ॲड. सा. मा. पंडित, शहराध्यक्ष शेख रशिद, श्री. गोविंद सोनी यांनी पुष्पहार घालून आंदोलनकर्त्यांचे स्वागत केले.

अटक झालेल्या कार्यकर्त्यांची नावे पुढीलप्रमाणे : संतोष मंजाराम तांदळे, सुदाम शेषराव गायकवाड, संजय नामदेव चव्हाण, तान्हाजी सर्जेराव उबाळे, संतोष चंद्रपुरी, संजय रंगनाथ भादवे, शिवाजी विठ्ठलराव जाधव, भास्कर देविदास करडे, किशोर गजानन तांदळे, राजू मंजाराम तांदळे इ.

गणोरी गावात जाताना रस्त्यांनी मुर्शिदाबाद वाडी, गणेशपूर व गणोरी येथे कार्यकर्त्यांनी फटाके वाजवून उत्स्फूर्तपणे ढोल वाजवून स्वागत केले. याप्रसंगी निवृत्ती पवार, संजय पवार, हरिदास मोटे, हरि विटेकर, मच्छिंद्र विटेकर, गणेश मोरे, अजिनाथ पवार, संजय शिंदे, गणेश तांदळे, कृष्णा पा. गावडे, सुरेश बखळे, काकासाहेब तांदळे, गोरख बोडसे, पंजाब आबा चव्हाण, साहेबराव म्हस्के, बाळासाहेब तांदळे, दामू अण्णा उबाळे, शिवाजी गायकवाड (गणेशपूर), जनार्दन भादवे, विकास तांदळे, शेषराव भादवे, विकास तांदळे, शेषराव भादवे, शेख रफिक, प्रभाकर गायकवाड, शेख रफिक, प्रभाकर गायकवाड, गणपत तांदळे, उमाशंकर गायकवाड, सुरेश शिंदे, संतोष शिंदे, मुकेश तांदळे, हसराम जाधव, शिवाजी जाधव, दत्तु गायकवाड, गजानन भादवे, साहेबराव गायकवाड, भाऊसाहेब गायकवाड, साईनाथ काळे इत्यादी स्वागत केले.

# शेतकरी संघटनेचे पाईक त्र्यंबक शंकर साठे यांचे निधन

**दिंडोरी, जि. नाशिक :** कुर्णोली येथील १९८० पासून शेतकरीसंघटनेचे पाईक असलेले त्र्यंबक शंकर साठे यांचे शनिवार दि. ११ फेब्रुवारी २०१२ रोजी अल्प आजाराने दुःखद निधन झाले. त्यांनी १९८०च्या कांदा-ऊस आंदोलनात २१ दिवस तुरुंगवास भोगला होता. त्यांनी सटाणा अधिवेशन, परभणी, धुळे, नागपूर, अमरावती, शेगाव, पुणे, चंद्रपूर, चांदवड महिला अधिवेशन या कार्यक्रमांना ट्रक भरून शेतकरी आणि महिलांना घेऊन सक्रीय सहभाग घेतला. राज्यातच नव्हे तर राज्याबाहेर चंडीगड जनसंसद, कुरुक्षेत्र, तिरुपती, दिल्ली, रामेश्वर येथेही शेतकऱ्यांना घेऊन हजर होते. भ्रष्टाचारविरोधी आंदोलनात जानोरी येथील विद्युत अभियंता शेख यांच्याकडून १५००० रुपये परत मिळवून ते मा. शरद जोशी यांच्या हस्ते जानोरी येथेच सभा घेऊन शेतकऱ्यांना परत दिले. १९८६ चांदवड अधिवेशन निधी जमा करण्यासाठी, स्वतःची जीप घेऊन तालुकाभर दौरा केला. चांदवड महिला अधिवेशनाच्या प्रचार दौऱ्याच्या निमित्ताने मा. शरद जोशी यांना कुर्णो ली गावात आग्रहाने आणले. पाच सहा वर्षांपासून तब्येतीमुळे ते जास्त फिरत नव्हते. त्यांचे शरद जोशी आणि संघटनेवर व्यक्तिशः प्रेम होते. असे हे शेतकरी असलेले कार्यकर्ते आपल्यातून निघून गेले. त्यांना शेतकरी संघटना परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली. शेतकरी संघटना परिवार त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.

**पान ९ वरून पुढे**

देशी व परदेशी गुंतवणुकीला मुक्तद्वार देऊन, त्यांना स्पर्धेत उतरविणे हा यावरील एक चांगला उपाय ठरेल. इतर बाबतींमध्ये उद्योगांचे व्यवस्थापन व मालकी कामगार, ग्राहक, कच्च्या मालाचे व सेवांचे पुरवठादार यांच्याकडे सोपवून, 'नाही रेंच्या हुकूमशाही'च्या ऐवजी ''आहेरें'ची 'आहेरें'साठी 'आहेरें'नी चालविलेली लोकशाही'' प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करावा. सरकारचे सर्व कल्याणकारी कार्यक्रम 'श्रद्धा व करुणा' तत्त्वांवर चालविलेल्या सुयोग्य संस्थांच्या हवाली करावेत.

**८. करप्रणाली**

वर्तमान अर्थमंत्र्यांनी करांचे सुसह्य दर आणि काटेकोर वसुलीची पद्धत असलेले समजदार करधोरण स्वीकारले, त्याचा लाभ मिळायला सुरवात झाली आहे. नुसते करांचे दर कमी करणे नव्हे, तर देशातील उत्पादक घटकांना करभारामुळे सामना कराव्या लागणारी स्पर्धात्मक असुविधा कमी करण्यासाठी एकूणच करसंकलन कमी करण्याची ही एक सुसंधी आहे. वर्तमान अर्थमंत्र्यांनी करप्रणाली अधिक पारदर्शक, न्याय्य करण्यासाठी जो पुढाकार घेतला आहे, तो पुढे चालू राहिला पाहिजे.

खरे म्हणजे एखाद्याची करपात्रता त्याची आस्थापना, खेळते भांडवल, क्षेत्र, ऊर्जावापर आणि टाकाऊ कचऱ्याची विल्हेवाट यांच्या आधारे अजमावून, त्याचे करदायित्व ठरवणे ही आदर्श पद्धती ठरेल. करवसुलीमधील सुधारणा कौतुकास्पद असली, तरी करदात्याच्या घरी प्रवेश करण्याचा किंवा जबरदस्ती घुसखोरी करण्याचा अधिकार कोणाही करवसुली कर्मचाऱ्याला असता कामा नये, हे तत्त्व मान्य झाले पाहिजे.

आजकाल, करवसुली ही सरकारी खर्च/उधळपट्टीसाठी निधी उभारणे यासाठीच केवळ केली जात नाही; लोकांना, विशेषतः विरोधकांना दमदाटी करण्यासाठी, ब्लॅकमेल करण्यासाठी त्याचा हत्यार म्हणून उपयोग केला जातो. करांचे प्रमाण, विशेषतः व्यक्तिगत करांचे प्रमाण कमी करण्याची आणि करप्रणाली पारदर्शक बनवण्याची आवश्यकता आहे.

जकात/अबकारी कर व मूल्यवर्धित कर यांच्या प्रणालींचे सतत पुनर्विलोकन व्हावे. पास्ता, नमकीन, पोटॅटो चिप्स, चीज, इडली-डोसा मिक्स आणि प्रक्रिया केलेले मांस व सागरी मत्स्यान्न यांना जकात/अबकारी करातून सूट दिलेली असली तरी, उदाहरणार्थ गोरगरीब, कुपोषित, प्रवासी मोठ्या प्रमाणात ज्यांचा वापर करतात, त्या एनर्जी बिस्किटांवर मात्र ८% अबकारी कर आणि १६% मूल्यवर्धित कर असावा हे, न कळण्यासारखे आहे.

(पूर्वप्रसिद्धी - ६ फेब्रुवारी २००७)

sharadjoshi.mah@gmail.com